# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००६ |
| वर्ष | : | सातवे |
| अंक | : | १२ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १११**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सातवे / अंक १२ / नोव्हेंबर २००६

## संपादकीय

### सूची साहित्याचे महत्त्व

सूची व कोश साहित्याची उपलब्धी नसणे ही अभ्यास करू इच्छिणारांच्या दृष्टीने मोठी अडचण असते. विविध प्रकाराने केलेल्या सूची आणि कोश अभ्यासाच्या व त्याचबरोबर प्रगतीच्या शक्यतांना वाव मिळण्याच्या दृष्टीने महत्वाच्या साधनांत समाविष्ट होतात. मराठी साहित्यात १९८० नंतरच्या कालखंडात प्रत्येक साहित्य प्रकारात महत्त्वपूर्ण योगदान देणारे जे लेखक, कवी, चरित्र आत्मचरित्रकार झाले, त्यांच्या साहित्याची सर्वांगपरिपूर्ण सूची होणे या दृष्टीने महत्त्वाचे आहे. मराठी कवितेच्या क्षेत्रात असे उल्लेखनीय योगदान असणारे डॉ. महेश केळुसकर यांच्या साहित्याची सूची ही संदर्भमूल्य असणारे साधन म्हणून 'दिशा'तून दिली आहे.

यापूर्वी अनेक प्रकारचे सूची साहित्य दिशातून देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या ग्रंथालयातील पोथ्या, कथाकार भारत सासणे यांच्या कथा, गीतेतील तत्त्वज्ञानपर संकल्पना अशा विविध सूचींचा दिशात समावेश झालेला आहे. महत्त्वाचे म्हणजे त्या त्या वेळी त्या त्या क्षेत्रातील जाणकारांनी सूची देण्याच्या या प्रयाताची आवर्जून दखल घेतली आहे.

सूचींचे संकलन हे अतिशय चिकाटीचे, वेळ खाणारे काम असते. परंतु मराठीत सूची साहित्य जसजसे समृद्ध होईल, संदर्भासाठी त्याचा वापर वाढेल तसतसा सूची संकलनासाठी खर्च झालेला हा वेळ सत्कारणी लागेल. कारण त्यातून प्रगतीच्या शक्यता वाढतील, अभ्यासकांच्या प्रयत्नांना दिशा मिळतील.

मराठी साहित्य, प्राचीन पोथी साहित्य या प्रमाणेच विज्ञानविषयक, तत्त्वज्ञानविषय क्षेत्रातील विविध सूचींचे संकलन होत रहाणे गरजेचे आहे. काळाच्या ओघात या सूचींचे महत्त्व वाढत जाते. महत्वाच्या ग्रंथांच्या सूची होणे हे ही गरजेचे आहे. आपल्याकडील अनेक महत्वपूर्ण चरित्रांना, आत्मचरित्रांना व्यक्तिनाम, स्थलनिर्देश सूची नसते. त्यांचा पदवी स्तरापासून ते अनौपचारिक संशोधनापर्यंत अभ्यास होतो. तेव्हा ही उणीव जाणवते. असे ग्रंथ शोधून त्यांच्या सूचीही बनायला हव्यात. अर्थात वर म्हटल्याप्रमाणे हे चिकाटीचे काम असते. पण ते करणे हे गरजेचे असते !




वर्ष सातवे / अंक १२ / नोव्हेंबर २००६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ११ वे / अंक ५ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@vsnl.net

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | फ्लॉरिडातील संख्याशास्त्राचे प्राध्यापक जे. सेतुरामन् एक चांगले संस्कृत कवी | डॉ. मो. दि. पराडकर | ३ |
| २) | योगी श्री अरविंद (लेखांक पहिला) | श्री शं.वा. मठ | ५ |
| ३) | ज्ञानपीठ पारितोषिकानिमित्त मराठी कवितेला अनोखा मानाचा मुजरा डॉ. महेश केळुसकर : वाङ्मय संपदा (भाग १) | डॉ. प्रदीप कर्णिक | ९ |
| ५) | कथा विकास व १९४० पर्यंतची मराठी कथा - धावता दृष्टिक्षेप (लेखांक ३) | श्री. मोहन पाठक | २२ |
| ६) | दूरदर्शन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीस मारक आहे का? | श्री. प्र. द. अरदकर | २८ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

ऑक्टोबरच्या अंकात पृ. ६वर डॉ. अनिल काकोडकर यांच्या छायाचित्राखाली अनवधाने डॉ. अनिल बेडेकर असे छापण्यात आले. या चुकीबद्दल दिलगीर आहोत.

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# फ्लोरिडातील संख्याशास्त्राचे प्राध्यापक जे. सेतुरामन् एक चांगले संस्कृत कवी

*डॉ. पराडकर सर फ्लोरिडात असताना संस्कृत या समान विषयामुळे त्यांना प्रा. सेतुरामन यांचा स्नेह लाभला. त्यांच्याबद्दलच्या या भावना. - संपादक*

१ जून १९९९ ते १२ सप्टेंबर १९९९ या काळात मी अमेरिकेतील फ्लॉरिडा राज्यात राहिलो. या राज्याची राजधानी तलहासी तेथेच माझा जवळजवळ तीन महिने मुक्काम होता. या मुक्कामात फ्लॉरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या धर्म-विभागाच्या अध्यक्ष डॉ. कॅथलीन यांच्याशी माझा भारतातूनच पत्रव्यवहार माझे तेथील भाचे डॉ. अशोक शहाणे यांच्यामुळे झाला व त्यातूनच तेथील संस्कृतज्ज्ञ व संख्याशास्त्रज्ञ डॉ. जे. सेतुरामन् यांची माझी ओळख झाली हा एक सुयोग म्हणायला हवा. मी डॉ. शहाणे यांच्या घरीच हक्काने उतरलो होतो व तेथे ते मला मुद्दाम भेटायला आले आणि या ओळखीचे रूपांतर स्नेहात झाले. स्नेहाला निमित्त लागत नाही किंबहुना याची उपपत्ती निमित्तावर अवलंबून नसते असे कविवर्य भवभूती म्हणतो, ते मला मान्यही आहे. तथापि, येथे संस्कृतने स्नेह दृढ करण्याचे काम केले हे कबूल केले पाहिजे.

पहिल्याच भेटीत मला कळले की प्रा. सेतुरामन् ना संस्कृतात चांगली गती आहे. त्यांनी 'श्रीवेङ्कटेश-माहात्म्य' नावाचे संस्कृत काव्य केलेले आहे. आपली कुलदेवता कन्याकुमारीचे ते अनन्य भक्त आहेत व त्यांनी ४२ श्लोकांचे 'परमकरुणापूरिम्बस्तोत्रम्' नावाचे भक्तिमधुर काव्य केलेले आहे. त्यांचा अध्ययन-अध्यापनाचा विषय मात्र संख्याशास्त्र. त्यातल्या २५ वर्षांच्या तलहासीमधील अध्यापनात १० ते १२ विद्यार्थ्यांना त्या विषयात पी.एच्.डी चे मार्गदर्शन करुन त्यांना पदवी मिळवून दिलेली आहे. अर्थात ही माहिती मला त्यांनी सहज म्हणून दिली. तथापि आमच्या चर्चेचा विषय होता संस्कृतातील वेदान्त आणि अलंकार ही शास्त्रे. संस्कृत वाचनाचाच नव्हे तर संस्कृतात रचना करण्याचा छंदही त्यांनी जोपासलेला आहे. संस्कृत साहित्य आणि भारतीय संस्कृती यांच्याबद्दलचा त्यांचा आदर तिळमात्र कमी झालेला नाही असे मला दिसले. त्यांचा पिण्ड हा कन्याकुमारीच्या एका भक्ताचा आहे.

वीक्षावीचीप्रसरसुधया ह्लादयन्ती मनो मे
देवी कन्या तदपि जननी मे हि गोत्रान्वयानाम् ।
कन्याम्बायां परमकरुणापूरिताम्बा मदीशा
नित्यं नित्यं मम कुलभवान् त्रायते त्राणदक्षा ॥

अशी सुरुवात करून, नित्यं नित्यं नटतु सा मानसाकाशरङ्गे, अशी उत्कट इच्छा व्यक्त करणारा हा भक्त माझ्या सर्व प्रमादांबद्दल क्षमा करून 'त्वद्दासं मे हृदयकमले कुर्वती निश्चलं त्वं' 'नित्यं नित्यं तव पदनतं शाधि मां त्वां प्रपन्नम्' या शब्दात या भावमधुर स्तोत्राचा समारोप करतो. या स्तोत्रात संक्षेपाने त्यांनी आपला कुलवृत्तान्त, आपला परिवार (पत्नी वृन्दा, मुलगा सुन्दर आणि मुलगी नित्या) या सर्वांच्या सुशिक्षितपणाचे व आपल्या संख्याशास्त्राच्या अध्ययन अध्यापनातील यशाचे सर्व श्रेय त्या विश्वनाथप्रिया आणि कीरहस्ता मीनाक्षीला देण्याची खबरदारी घेतलेली आहे.

'श्रीवेङ्कटेश-अमेरिका-वैभव-स्तोत्रम्' हे करुणासुधासागर श्रीवेङ्कटेशाच्या अमेरिकेतल्या निरनिराळ्या शहरांना दिलेल्या भेटीचे ५३ श्लोकांत वर्णन

करणारे काव्य. यातही श्रीवेङ्कटेशाची 'अनेकानि निकेतनानि भवन्ति' यावर दृढ विश्वास तथापि मदनुग्रहाय 'गृहे मदीये' तो प्रभु निवास करतो आणि म्हणूनच 'स्मृत्वा स्मृत्वा पुनरपि पुन: ते दिव्य गहान्' इतकेच नव्हे, तर ध्यात्वा ध्यात्वा मुहुरपि मुहुर्देव ते दिव्यरूपम्' हा 'तल्लहासी निवासी भक्त' केवळ माझ्याच नव्हे तर सर्व भक्तांच्या 'वाच्छाज्वालाग्नि' शान्त करो ही इच्छा व्यक्त करतो. कारण श्रीवेङ्कटेशाची इच्छा सर्व लोकांच्या आधि-व्याधींचे निवारण (जनार्तिहराय समागत:) करण्याची आहे.

त्यांनी एका शुक्रवारी आपल्या कुलदेवतेची षोडशोपचार-पूजा आपल्या निवासस्थानी केली, स्वत: रचलेली 'सहस्रनामावली' मला भेट दिली. योगायोगाने त्यांचे गुरू श्री चंद्रशेखर सरस्वती (परमाचार्य) यांना श्रद्धांजली देणारा माझा लेख त्यावेळी माझ्याजवळ असणाऱ्या 'अनुसन्धान' या पुस्तकांत होता. तो त्यांच्या वाचनात आला आणि मग त्यांनी मला त्यांच्यावर इंग्रजीत भाषण देण्यास सांगितले. यामुळे वाङ्मय आणि तत्त्वज्ञान यांची आवड असणाऱ्या तलहासी-निवासी आणि मी यांच्यामध्ये 'सेतू' निर्माण करण्याचे कार्य त्यांनी मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने केले. त्यांच्यामुळेच फ्लॉरिडा स्टेट युनिव्हर्सिटीच्या 'एशियन स्टडीज' या विभागांत संस्कृतचे भारतातील स्थान' यावर माझे व्याख्यान झाले. इस्कॉनचे कृष्ण कॉनशनेस' समोर मी धर्मावर बोलू शकलो आणि श्री. देसाई यांच्या घरी दोन भाषणे होऊ शकली.

फ्लॉरिडातील आमच्या निवासस्थानी, (अर्थात डॉ. अशोक शहाणे) माझ्या अनेकवेळा त्यांच्याशी चर्चा झाल्या; त्यांनी आपल्या संग्रहातील संस्कृत सन्देशा-काव्ये मला वाचावयास दिली, त्यांच्या 'वेङ्कटेस माहात्म्य' चे मी हिन्दीत भाषांतर करून दिले. वेदान्त व अलंकार जोवरचे काही ग्रन्थ आम्ही वाचले. 'भ्रांतिमान्' अलंकाराचे मम्मटाच्या काव्यप्रकाशातील उदाहरण मी त्यांना म्हणून दाखविले, ते त्यांना इतके आवडले की स्वत: आणलेल्या छोट्या कॉम्प्युटरवर (किंमत ३००० डॉलर्स) तावडतोब छापून दिले !

तात्पर्य, भारतीय संस्कृति आणि संस्कृत यांबद्दल अभिजात असणारा व अमेरिकेतही ती प्रयत्नपूर्वक जोपासणारा 'समानधर्मी' मला फ्लॉरिडातील राजधानीत अकल्पितपणे भेटल्यामुळे चि. अशोक शहाणे व सौ. मीना शहाणे यांच्याकडील माझे ते तीन महिने काव्यशास्त्रविनोदात जाऊ शकले. याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे माझे कर्तव्यच ठरते. या कृतज्ञतेला आणखी एक स्नेहाचा पदरही आहे. माझी सहधर्मचारिणी सौ. मंगला पराडकर दि. ६ नोव्हेंबर २००१ रोजी १५ मिनिटातच अचानक मलाच नव्हे, तर त्यांच्यासारख्या माझ्या स्नेही-मंडळींना सोडून गेली. हे कळल्यानंतर Brinda and I were shocked and saddened to hear the news about Mrs. Paradkar.

एवढे लिहून न थांबता

मङ्गला मङ्गलाकारा मङ्गलाभरणभूषिता ।<br>
सौभाग्यगुणोपेता सौभाग्याब्धिसुचन्द्रिका ।।<br>
राजहंसी व सोढीयते विहायास्मान् विहायसा<br>
मित्रगणि च प्रति सर्वान् बहुपुण्यबलेन किम् ।।

या श्लोकात त्यांना श्रद्धांजली वाहिली ! म्हणूनच यथार्थनामा प्रा. सेतुरामन् यांना माझी ही स्नेहरूप अंजली.

**डॉ. मो. दि. पराडकर**<br>
**माहीम, मुंबई.**

# योगी श्री अरविंद
# (लेखांक पहिला)

*योगी श्रीअरविंदाचे जीवनकार्य उलगडून दाखवणारे हे चरित्र या अंकापासून देत आहोत. - संपादक*

## १५ ऑगस्ट विशेष दिवस

श्री रामकृष्ण १५ ऑगस्टला समाधिस्थ झाले. स्वातंत्र्य दिनाला हाच शुभ दिनांक नियुक्त केला गेला. आणि याच शुभ दिनांकावर श्रीअरविंद यांचा जन्म १५ ऑगस्ट १८७२ रोजी कलकत्त्यास बॅरिस्टर मनमोहन घोष यांच्या निवास स्थानी पहाटे साडेचार वाजता झाला. त्यांचे वडील श्रीकृष्णघन घोष हे शासकीय वैद्यक विभागातले अधिकारी होते. त्यांच्या मातोश्री स्वर्णलता देवी या भारतीय संस्कृतीचे विख्यात भाष्यकार ऋषी राजनारायण बोस यांच्या जेष्ठ कन्या, श्री अरविंद हे त्यांचे तिसरे चिरंजीव. त्यांच्या वडील भावांची नांवे विनयभूषण व मनमोहन अशी होती.

## श्वशुर व जावई यांच्यातील स्वभाव भेद

श्री राजनारायण बोस व त्यांचे जावई कृष्णघन घोष यांच्या भारतीय व युरोपीय संस्कृती विषयीच्या मतात पराकाष्ठेचा विरोध होता. श्री राज नारायण यांनी इंग्रजाळलेल्या बंगाली लोकांना भारतीय संस्कृतीकडे आणि रीतीभातींकडे वळवून आणण्याचा प्रयत्न इ.स. १८६१ पासून चालवला होता. लेखन व भाषण बंगालीतून करावे. युरोपीय वेषभूषा टाकून धोतर उपरणे वापरावे. भारतीय क्रीडा व व्यायाम यांचा अंगीकार करावा, भारतातील आयुर्वेदाचा प्रचार करावा असे प्रोत्साहन ते लोकांना देत असत. त्यांच्यात मातृभूमीविषयी उत्कट भक्तिभाव होता आणि त्यांना भारताच्या इतिहासाचीही चांगली जाण होती. तिचे भवितव्य महान असल्याचा त्यांचा दृढ विश्वास होता. भारताच्या स्वातंत्र्यासाठी चळवळ करण्याकरता एक गुप्त मंडळही त्यांनी स्थापन केले होते. बल प्रयोगाने या देशातील शत्रूचा नि:पात करण्याची शपथ सदस्यांना घ्यावी लागे. श्री रविंद्रनाथ ठाकूर व त्यांचे बंधू जोतींद्रनाथ दोघेही या मंडळात होते. ते अत्यंत कर्तृत्ववान असून त्यांचे व्यक्तिमत्त्वही विलक्षण प्रभावी होते. शिक्षणासाठी ब्रिटनला गेलेल्या पहिल्या काही विद्यार्थ्यांपैकी ते एक होते. ॲबर्डीन विद्यापीठाची वैद्यकीय पदवी मिळवून ते भारतात परतले. तेव्हा ते सवयी, विचारसरणी व आदर्श या सर्वच बाबतीत संपूर्णतया इंग्रजाळलेले होते.

## डॉ. कृष्णघनांचा आग्रही स्वभाव

आपल्या मुलांचे लालन पालन सर्वतोपरी युरोपीय पद्धतीनेच झाले पाहिजे असा श्री कृष्णघनांचा निर्धार होता. श्री अरविंद बालवयात इंग्रजी व हिंदुस्थानी याच भाषा बोलत. मातृभाषेचे ज्ञान त्यांनी मिळवले ते इंग्लंडमधुन परतल्यानंतरच. आयरिश भिक्षुणींनी दार्जिलिंग येथील चालवलेल्या लोरेट्टो कॉन्व्हेंट स्कूलमध्ये दोनही वडिल बंधूसह श्री अरविंदांचेही नाव इ.स. १८७७ त घालण्यात आले. हिमालयातील रम्य अशा निसर्गाच्या अंगाखांद्यावर त्यांनी दोन वर्षे व्यतीत केली. या काळासंबंधी विशेष माहिती उपलब्ध नाही.

श्री अरविंदाना एक स्वप्न पडले. ते अर्थपूर्ण होते. श्री अरविंदानी वर्णन लिहून ठेविले आहे.

"एक दिवस अंथरुणावर पडलेलो असताना माझ्या अंतरंगात शिरुन माझ्या सकट उभ्या विश्वाला व्यापून टाकणारा अंधाराचा प्रचंड लोट मला एकाएकी दिसला. तेव्हा पासून पुढे इंग्लंडमधील समस्त वास्तव्यात एक प्रकारचे

तम मजवर घोंघावत राही. मला वाटते त्या अंधारांचा या तमाशी काहीतरी लागाबांधा असावा. भारताकडील परतीची वाटचाल करू लागल्यानंतरच या तमाने मला सोडले."

**शिक्षण इंग्लंड मध्ये**

(मँचेस्टर येथे १८७९ ते १८८४ वय ७ ते १२)

इ.स. १८७९त डॉ. कृष्णधन घोष आपल्या तीनही मुलांना घेऊन त्यांच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. डॉ. ज्या रंगपुरात रहात असत तेथील न्यायाधिश श्री ग्लेझिया यांचे बंधु रे विल्यम ड्रुइट यांच्याकडे तीनही मुलांना ठेवण्याची व्यवस्था केली. श्री अरविंद ड्रुइट याजकडे पांच वर्षे राहिले. विल्यम हे स्टॉकपोर्च रस्त्यावरील कॉंग्रिगेशनल चर्चचे धर्माधिकारी होते. या चर्चला अष्टकोनी चर्च असे नांव होते. या चर्च जवळच शेक्सपीयर रस्त्यावर ८४ क्रमांकाच्या घरात त्यांचे वास्तव्य असे. परंतु वय लहान असल्याने श्री अरविंदाना घरीच ड्रुइट पतीपत्नी शिकवीत. ड्रुइट एक निष्णात लॅटिन पंडित होते. श्री अरविंदांच्या इंग्रजी व लॅटिन भाषांच्या अध्यपनाचा पाया उत्तम प्रकारे त्यांनी घालून दिला. श्रीमती ड्रुइट त्यांना इतिहास, भूगोल, गणित, फ्रेंच शिकवीत. घरीच शिक्षण मिळत असल्याने श्री अरविंदाना वाचावयाला भरपूर वेळ मिळे. त्याचा फायदा घेऊन त्यांनी बायबल, शेक्सपीयर, शेले, कीट्स यांचे साहित्य वाचले. इतक्या लहान वयात ते काव्य वाचीत, फॅक्स फॅमिली या नियतकालिकासाठी पद्यरचनाही करीत.

आपल्या मुलांचा कोणत्याही भारतीय व्यक्तीशी परिचय अथवा कोणत्याही प्रकारे भारतीय संस्कृतीशी संपर्क घडून येऊ नये अशा निकराच्या सूचना डॉ. घोष यानी या दांपत्यांला दिल्या होत्या. त्या शब्दश: पाळल्या जात. श्री अरविंद मोठे झाले तेव्हा भारत देश भारतीय लोक, भारताचा धर्म भारतीय संस्कृती या विषयी संपूर्णतया अंधारातच होते. त्यांचा सर्वात धाकटा भाऊ बारिन याचा जन्म इंग्लंडमध्येच ग्मॉयडेन येथे दिनांक ५ जानेवारी १८८० रोजी झाला. श्री अरविंदाना बाटवून ख्रिस्ती केल्याचा प्रवाद प्रसृत झाला कारण त्यानी एकदा प्रार्थना म्हटली एवढ्यावरुन हा प्रवाद वाढला.

श्री अरविंदाचे नांव सेंट पॉल विद्यालयात आणि केंब्रिज विद्यापीठात अरविंद अक्राइट घोष असे लावलेले होते. इंग्लडला जाण्यापूर्वी डॉ. घोष भारतातच राहात होते. इ.स. १८७२ साली श्री अरविंदाच्या जन्मवर्षी कोणी अनेट अक्रॉइट नावाच्या बाई कलकत्यास आल्या होत्या व नामकरणाच्या वेळी उपस्थित होत्या. श्री अरविंदाच्या पिताजीना मुलाच्या नावांत एखादे इंग्रजी नांव असावे असे वाटले. त्यानी अक्रॉइटचे नाव त्याच्या नावाला चिकटविले. कालांतराने अक्रॉइट या नावाचा श्रीअरविंदानी त्याग केला. या लहान वयातच क्रांतिकारी परिवर्तनाचे युग येत आहे. आपण हातभार लावावा असे श्री अरविंदाना वाटत असे.

**लंडनला प्रयाण**

(सप्टेंबर १८८४ ते जुलै १८९० वय १२ ते १८)

इ.स. १८८४त श्रीअरविंद व श्रीमनमोहन या उभयताना सप्टेंबर मधे सेंट पॉल विद्यालयात प्रवेश मिळाल्याने ते दोघे लंडनला गेले. मुख्याध्यापक डॉ. वॉकर यांनी श्रीअरविंद यांची चाचणी परीक्षा घेतली. आणि त्यांचे लॅटिन सकट सर्व विषयातले प्रावीण्य पाहून ते संतुष्ट झाले. अभ्यासाच्या प्रगतीकडे व्यक्तीश: लक्ष पुरवून त्यांनी ग्रीक भाषाही श्रीअरविंदाना स्वत:हून शिकविली. ग्रीक लॅटिन अभिजात साहित्याचा अभ्यास करुन श्री अरविंद यांनी साहित्य विषयात बटरवर्थचे दुसरे, आणि बेडफोर्डचे इतिहासाचे पारितोषिक पटकावले. या छोट्या विद्यार्थ्याला विकासाची संधी देण्याची मुख्याध्यापकाचीच मनीषा असल्याने श्री अरविंदाची वरच्या वर्गातील वाटचालही झपाट्याने पार पडली. श्री अरविंद सेंट पॉलच्या विद्यालयातील साहित्य सभेच्या कामातही सक्रिय भाग घेत असत. दिनांक ५ नोव्हेंबर १८८१ ला स्वीपटचा राजनैतिक

मतातील विसंगती या विषयावरील आणि १९ नोव्हेंबर ला मिल्टनवरील वादविवादात भाग घेऊन श्री अरविंदानी असाधारण प्रावीण्य प्रकट केले. सेंट पॉल हे वसतिगृह विरहित विद्यालयात होते. तिथे केवळ दिवसाच शाळा भरत असे.

श्री अरविंद बहुतेक वेळ अवांतर ग्रंथ वाचनात घालवीत. इंग्रजी काव्य साहित्य, कल्पित कथा, फ्रेंच साहित्य तसेच प्राचीन, मध्ययुगीन, व अर्वाचीन युरोपचा इतिहास वाचण्यात घालवीत. इटालियन, जर्मन व थोडेस स्पॅनिश या भाषा शिकण्यातही ते थोडा वेळ घालवीत, काव्य वाचनात मात्र खूप वेळ रमत.

तिघेही बंधू लंडन मध्ये काही काळ श्री ड्रुरांट यांच्या मातोश्रीच्या सोबतीने राहात. धर्माच्या प्रश्नावर मनमोहनशी भांडण झाल्याने त्या निघून गेल्या. मग विनयभूषण व श्रीअरविंद असे दोघे दक्षिण केन्सिन्टन लिबरल क्लब येथे एक खोली घेऊन राहू लागले. सर् हेन्री कॉटन् या क्लबचे कार्यवाह होते. विनय त्याना त्यांच्या कामात मदत करीत असे. मनमोहन एका भाड्याच्या घरात राहू लागला.

वडील पैसे अनियमितपणे पाठवीत. लंडन मधील शालेय जीवनात श्री अरविंदाना फार हाल अपेष्टा भोगाव्या लागल्या. सकाळी एक कपभर चहा आणि लोणी लावलेले पावाचे दोन काप व संध्याकाळी एक पेन्सचा पाव एवढ्या अन्नावरच एक पुरे वर्षभर त्याना निर्वाह करावा लागला. घरमालकीण कनवाळू होती, आम्ही महिनेच्या महिने भाडे दिले नाही तरी कधी एका शब्दाने विचारले नाही. त्या मालकिणीचे पैसे मी माझ्या आय्.सी.एस् शिष्यवृत्तीतून भागविले. असे श्री अरविंद यांनीच म्हटले आहे.

(ऑक्टोबर १८९० ते ऑक्टोबर १८९२ वय १८ ते २०)

सेंट पॉल विद्यालयात ग्रीक लॅटिन साहित्यातल उच्च श्रेणीची वार्षिक ८० पौंडाची शिष्यवृत्ती पटकावून १८९० साली ऑक्टोबर महिन्यात श्री अरविंद केंब्रिज येथील किंग्ज् महाविद्यालयात प्रविष्ट झाले. एकाच वर्षात क्लासिकल ट्रायपॉसची परीक्षा पहिल्या वर्गात उत्तीर्ण होऊन ग्रीक व लॅटिन कवितेची सगळी पारितोषिके श्री अरविंदानी मिळविली. मात्र पदवी केंब्रिज विद्यापीठातून घेतली नाही. श्री अरविंदानी दोन वर्षात ट्रायपासची परीक्षा दिली. हा अभ्यासक्रम तीन वर्षाचा असतो म्हणून पदवी मिळाली नाही. शिष्यवृत्तीसाठी दिलेल्या उत्तर पत्रिका ऑस्कर ब्राउनिंग यानी तपासल्या होत्या.

## आय्. सी. एस् .

आय् सी एस् चे आकर्षण श्री अरविंदाना नव्हते. कुटुंबातील लोकाना त्या पदवीबद्दल विशेष वाटत असल्याचे ते जाणून होते. घोड्यावर बसण्याच्या चाचणीत उत्तीर्ण न होण्याचे ठरविले. श्री अरविंदाना आय् सी एस् मधे अपात्र ठरविण्यात आले. यासाठी उत्तीर्ण प्रमाणपत्र त्याना आम्ही देऊ शकत नाही असे सांगण्यात आले.

## श्री अरविंदाच्या मनातील विचार

भारतातील ब्रिटिश शासनाचा पाषाणहृदयी धोरणाविरुद्ध गाऱ्हाणी सांगणारी पत्रे डॉ. घोषांनी आपल्या इंग्लडमधील मुलांना लिहिली. काही वृत्तपत्रातील कात्रणे पाठविली. या सर्वांमुळे श्री अरविंदाच्या मनात विदेशी शासनाने भारतावर लादलेल्या पारतंत्र्या विरुद्ध रोषाची भावना उत्पन्न झाली. केंब्रिज येथे असताना इंडिअन् मजलीसचे एक सदस्य पुढे कार्यवाह झाले. तेथे श्री अरविंदानी काही क्रांतिपर भाषणे केली. यामुळे इंग्रजांचा कल त्याना आय् सी एस् मधून वगळण्याचा झाला असावा.

भारताचे एक मवाळ पुढारी श्री दादाभाई नौरोजी यांच्या नेतृत्वा विरुद्ध सतत बंड उभारणाऱ्या लंडन वासी भारतीयांच्या एका छोट्या गटाचे श्री अरविंद व त्यांचे बंधू विनय हे दोघे घटक होते. त्यावेळी बडोद्याचे गायकवाड महाराज लंडन मधे होते. सर हेन्री कॉटन यांच्या बंधूने

त्यांच्याशी श्री अरविंदांचा परिचय करुन दिला. व पुढे त्यांना बडोद्याला नेमणूक मिळाली. त्यांनी भारताला परतण्यासाठी १८९३ जानेवारीला इंग्लंड सोडले.

आपल्या आयुष्याची संस्कारक्षम वर्षे श्री अरविंदानी आधी दार्जिलिंगच्या कॉन्व्हेंन्ट स्कूल मधे, पुढे इंग्लंड मधे पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाखाली घालविली. वयाच्या एकविसाव्या वर्षी ते मायदेशी परतले. त्यांच्या हातून इथे महत्त्वाचे कार्य व्हावे अशी विधात्याची इच्छा दिसते.

बऱ्याच दिवसाच्या इंग्लंड येथील वास्तव्याने श्री अरविंदाना इंग्रजी संस्कृती व रीतीभाती या विषयी जिव्हाळा वाटू लागला असणार अशी समजूत होणे साहजिक आहे. पण त्यांना तसे वाटले नाही, त्यांना फ्रान्स विषयी जिव्हाळा होता असे त्यांनीच एके ठिकाणी म्हटले आहे.

कृष्णघन आपल्या मुलाच्या परतण्याची आतुरतेने वाट पाहत होते. परंतु ती शुभ घटना पाहावयास ते जगले नाहीत. श्री अरविंद ज्या बोटीने निघाले ती बोट पोर्तुगील सागरतीरी बुडाल्याची माहिती त्याना चुकीने कळविण्यात आली. आपला मुलगा त्या बोटीत होता. तो बुडाला हा धक्का असह्य ठरला व ते हृदय विकाराने आकस्मिक गेले. पण श्री अरविंद दुसऱ्या बोटीने निघाले. ती मुंबई बंदराला सुखरुप पोहोचली. भारतीय प्रदेशात पाय टाकताच श्री अरविंदाना एक प्रकारची विशाल शांती लाभली.

क्रमश:

**शं.वा.मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३ २०३०

**कोकण प्रशासकीय विभाग व तालुके**

| जिल्हा | तालुके |
|---|---|
| १) मुंबई | - |
| २) मुंबई उपनगर | - |
| ३) ठाणे | १) ठाणे २) कल्याण ३)मुरबाड ४) भिवंडी ५) वसई ६)शहापूर ७) वाडा ८) तालासरी ९) उल्हासनगर १०) पालघर ११) विक्रमगड १२) जव्हार १३) अंबरनाथ १४) मोखाडा १५) डहाणू |
| ४) रायगड | १) अलिबाग २) पनवेल ३) पेण ४) उरण ५) खालापूर ६) कर्जत ७) रोहा ८) माणगाव ९)(पाली) सुधागड १०) म्हसळा ११) महाड १२) पोलादपूर १३) श्रीवर्धन १४) तळा १५) मुरूड |
| ५) रत्नागिरी | १) रत्नागिरी २) राजापूर ३) लांजा ४) दापोली ५) मंडणगड ६) खेड ७) चिपळूण ८) संगमेश्वर ९) गुहागर |
| ६) सिंधुदुर्ग | १) सावंतवाडी२) कणकवली ३) वैभववाडी ४) देवगड ५) कुडाळ ६) मालवण ७) वेंगुर्ला ८) दोडामार्ग |

# ज्ञानपीठ पारितोषिकानिमित्त मराठी कवितेला अनोखा मानाचा मुजरा

# डॉ. महेश केळुसकर : वाङ्मय संपदा (भाग १)

*यंदाच्या वर्षी भारतातील वाङ्मयातील सर्वोच्च बहुमान, 'ज्ञानपीठा'च्या रूपाने मराठी कवितेने मिळवला. महाकवी विंदा करंदीकरांवर अनेक प्रकाराने लिहून आले, त्यांचे अमाप कौतुकही झाले, आणि ते रास्तच होते. मराठी कवितेला मानाचा मुजरा म्हणून आणि एक वेगळा प्रयोग म्हणूनही आम्ही कवी महेश केळुसकरांच्या साहित्याची सूची प्रकाशित करीत आहोत. मराठी काव्याच्या सत्काराची ही 'अनोखी वाट' आमच्या वाचकांना आवडेल असा विश्वास वाटतो आणि मराठी काव्याचे अभ्यासकही याचे स्वागत करतील असे वाटते. - संपादक*

**परिचय**

डॉ. महेश केळुसकर हे मराठीतील ख्यातनाम कवी. त्यांचा 'पहारा' हा काव्य संग्रह विशेष गाजला. त्यातल्या 'शरदाचे चांदणे' या कवितेने मराठी वाङ्मयात एकाच वेळी एकदम 'हलचल' निर्माण केली. कवी म्हणून काव्यवाचनाचा व काव्यलेखनाचा सर्व बाज आत्मसात करणाऱ्या या कवीची पहिली कविता १९७७ साली प्रकाशित झाली. त्यांच्या या काव्यलेखनाचे तीन दशक पूर्ण होत आहेत, तसेच त्यांचे पहिले पुस्तक १९८६ साली (मोर) प्रकाशित झाले. या घटनेने दोन दशक पूर्ण केले आहेत.



डॉ. महेश केळुसकर

**अल्पपरिचय**

नाव : महेश वासुदेव केळुसकर

जन्म : ११ जून १९५९, फोंडाघाट, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.

शालेय शिक्षण : आठवी पर्यंत फोंडाघाट आर. पी. डी. हायस्कूल, सावंतवाडी येथे पुढील शिक्षण.

महाविद्यालयीन : पंचम खेमराज महाविद्यालय, सावंत वाडी.

**शिक्षण :**

१) बी. ए. मराठी. प्रथम वर्ग रत्नागिरी जिल्ह्यात सर्वप्रथम. मुंबई विद्यापीठ

२) एम. ए. मराठी. प्रथम वर्ग रत्नागिरी जिल्ह्यात सर्व प्रथम. मुंबई विद्यापीठ.

३) पी. एच. डी. - डॉ. सुरेश जोशी मार्गदर्शक 'मालवणी मुलखातील काही प्रयोगात्मक लोककला' या विषयावर प्रबंध सादर.

**अनुभव :**

१) बाळकृष्ण कोल्ड्रींक हाऊसवर काऊंटर सांभाळणे व इतर किरकोळ कामे. २) 'कमवा आणि शिका' योजनेखाली पंचम खेमराज महाविद्यालयाच्या ग्रंथालयात चार वर्षे. ३) दैनिक रत्नभूमी. सात महिने उपसंपादक. ४) काही दिवस शिक्षक. ५) ऑल इंडिया रेडिओ, रत्नागिरी केंद्र, येथे जून १९८२ साली रुजू. १९८२ ते १९९१ नऊ वर्षे रत्नागिरी केंद्रावर कार्य. ६) १९९१ साली केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन जून १९९१ मध्ये मुंबई आकाशवाणी केंद्रावर 'प्रोग्रॅम एक्झिक्युटिव्ह' म्हणून पदभार स्वीकारला.

**पुरस्कार**

१) पीएच. डी. च्या प्रबंधाला मुंबई विद्यापीठाचा 'कै. अ. का. प्रियोळकर पुरस्कार' (१९९६-९७) प्राप्त. २) कोकणातील लोककला संशोधनासाठी गौड ब्राह्मण सभेचा 'रावबहादूर बावडेकर पुरस्कार' (२००३) ३) दीर्घ कालीन वाङ्मय सेवा व लोककला संशोधनासाठी 'पद्मश्री भाऊसाहेब वर्तक पुरस्कार' (रु. २५ हजार व मानचिन्ह) (२००४). ४) 'झिनझिनाट' काव्यसंग्रह 'यशवंतराव चव्हाण सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणे' पुरस्कार (१९९८). ५) 'साष्-टांग-नमस्कार' ग्रंथास म. सा. प. चा 'चिं. वि. जोशी पुरस्कार (२००१) व महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार (२०००-२००१)

**प्रमुख पाहुणे**

१) पाटकर विद्यालय इंग्लिश मिडियम स्कूल, डोंबिवली. १७ डिसें. २००२. २) कोमसाप. ४ थे रायगड जिल्हा साहित्य संमेलन, महाड. १८ जाने. २००३. ३) सरस्वती विद्यालय, वासिंद २६ जाने. २००३. ४) पी. एल. श्रॉफ कॉलेज, चिंचणी. २६ डिसें. २००३

**सन्माननीय सभासद**

1) Member of the Advisory Committee of 38th Inter Collegiate cultural Compitition 2005-2006 - University of Mumbai. २) कै. अ. का. प्रियोळकर पारितोषिक समिती, मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग.

**विषय तज्ज्ञ (आकाशवाणी पत्रकारिता आणि स्वर साधना)**

१) सेंट झेवियर्स महाविद्यालय, मुंबई. २००५. २) के. सी. महाविद्यालय, मुंबई. एप्रि. २००५ ते मार्च २००६. ३) मुंबई विद्यापीठ. डिसें. २००५.

## केळुसकरांचे साहित्य

**प्रकाशित ग्रंथ**

**कविता संग्रह**

१) मोर. पुणे : इंद्रायणी साहित्य, १९८६ पृ. ५५. २) पहारा. मुंबई : असर प्रकाशन, १९९६ पृ. ७३. ३) झिनझिनाट. मुंबई : मॅजेस्टिक प्रकाशन, १९९७ पृ. ४७

**चारोळ्या काव्यसंग्रह**

१) मी (आणि) माझा बॅंडबाजा. डोंबिवली : उमा महेश, १९९५. पृ. दिली नाही. (आकार पॉकेट) २) रोज डे.

**समीक्षा लेखसंग्रह**

१) कलमबंदी. मुंबई : मिलिंद पेंढारी, २००२. पृ. ९६.

**विनोद - लेखसंग्रह (शब्दार्थ चित्रसंग्रह)**

१) साष्-टांग-नमस्कार. वसई : डिंपल पब्लिकेशन, २०००. पृ. १७५. आवृत्ती दुसरी २००६.

**बालवाङ्मय**

१) डोंगर चालू लागला (बालकथा) : ठाणे, संदर्भ प्रकाशन, १९९६. पृ. ३२.

## अनुवादित बालवाङ्मय

१) कपिलेने घेतला झोका २री आ. (युजा आणि टॉमस विसलँड, मू. ले) नवी दिल्ली : नॅशनल बुक ट्रस्ट, २००३. पृ. २२. आकार रॉयल, चार रंगी चित्रे.

## संपादन

१) कवितांच्या गावा जावे. वसई : डिंपल पब्लिकेशन, २००१. पृ. १६०.

## कादंबरी

१) यू कॅन ऑल्सो बिन- वसई, डिंपल प्रकाशन, २००६.

## पुस्तिका

१) मराठी कवितेसमोरील वर्तमान आणि भविष्य. (काव्यरसिक मंडळ, डोंबिवली आयोजित ३९ वे वार्षिक स्नेहसंमेलनात - दि. १४ व १५ फेब्रु. २००४, केलेले अध्यक्षीय भाषण) डोंबिवली : काव्यरसिक मंडळ, २००४. पृ. ८

## आगामी पुस्तके

१) मालवणी रॉंबाट (विनोदी काव्यकणिका)

२) मत्स्यरिका (राजकीय व्यंग कविता) लोकसत्ता, महानगर, तरुण भारत, लोकमत दैनिकात प्रकाशित झालेल्या छोटा व्यंगात्मक राजकीय कविता.

३) स्वर साधना. यशवंतराव चव्हाण म. मु. विद्यापीठ. वृत्तविद्या अभ्यासक्रमासाठी.

## ध्वनीफित

१) झिनझिनाट. मुंबई : दर्शन कॅसेट कंपनी, नोव्हें. १९९४. संगीत : सचिव-संजय. निवेदन : करुणा देव. काव्य - नाट्य लेखन : महेश केळुसकर.

२) झिनझिनाट. मुंबई : मैत्रेय मास कम्युनिकेशन्स सर्व्हिसेस प्रा. लि. २००३ कविता निवेदन : महेश केळुसकर संगीत : सुभाष मालेगावकर.

## संगीतबध्द गीतरचना

**(आकाशवाणी मुंबई केन्द्रावरुन वेळोवेळी प्रसारित) नोंदीचा क्रम गीतरचना, संगीतकार, गायक गायिका या क्रमाने आहे.**

१. सुखाच्या नदीला कुणी दृष्ट केली... : केदार पंडित : रवीन्द्र बिजूर २. खेळण्याचे दिवस होते. : भीमराव पांचाळे : भीमराव पांचाळे ३. याच काठावरति आहे मी कधीची. : वि. दे. अंभईकर : शोभा जोशी ४. चंद्र तो गगना खुळ्या फसवुन गेला.: श्रीनिवास खळे : कविता कृष्णमूर्ती ५. पेरतो पाऊस प्रेमाचा प्रभु रे...: भूमानंद बोगम: आकाशवाणी गायकवृंद ६. गाणे म्हणत ही आली निळी पावसाची सर...: अशोक पत्की : रवीन्द्र साठे ७. रानात झिम्म पाऊस ...: प्रभाकर पंडित, उत्तरा केळकर ८. तुझ्या शुध्द अंधाराला...: अभिजित लिमये : सरिता भावे ९. इथे दूर गावात भारून आली...: भूमानंद बोगम : आकाशवाणी गायकवृंद १०. हलकेच सुगंधी साद कुठुन ही आली...: दत्ता डावजेकर : सुरेश वाडकर ११. पावसात भिजतांना जवळ घे...: अभिजित लिमये: देवकी पंडित १२. हिरो तुमी झक्कास हायसा...: अभिजित लिमये १३. करमत नाही यार पुन्हा येना...: अभिजित लिमये १४. देखणे तारे किरण...: अशोक पत्की १५. मन फुलले...तन झुलले... अशोक पत्की.

## असंग्रहित साहित्य कविता

(नोंदींचा क्रम – कविता, रचना काल, नियतकालिक व प्रसिद्धी दिनांक असा आहे.)

■ नक्षीदार प्याले. : रत्नभूमि : २३.१.७७ ■ मातीला सुवास : १४.१०.१९७६. : रत्नभूमि : ३१.१.७७ ■ महापूर: १९७७ : मायमराठी दिवाळी : १९७७ ■ तुझ्या स्मिताचा स्मरणगंध : १.८.७७ : साप्ता. गोमन्तक : १९.२.७८ ■ अशा थंड पावसात : २१.५.७८ : राजस ऑक्टो.: १९७८ ■ आठवणींचा पाऊस : २१.८.७७ : राजस ऑक्टो.: १९७८ ■ दिवे गेल्यावर सुन्न झालेले शहर.: ३.५.७८. : अधिष्ठान दिवाळी ७८., कोकणवाणी, आकाशवाणी, रत्नागिरी २३.५.७९ ■ बालगो नि मालग्या: १९७७ : सत्यकथा जून ७९. मंथन झिनझिनाट पृ. १३. ■ आभाळभर भरारताना : १३.८.७८ : हेमांगी-रासंतिक – ७९ ■ असेही काही... मराठी हायकू.- : रत्नागिरी टाइम्स ४.१०.८१ ■ सुन्न संवेदन.: २८.१०.७९ : अनुष्टुभ : १९८०-८१ ■ आम्ही सुखे मस्त : २५.७.७८ : हेमांगी दिवाळी १९८० ■ कोकणराणी, आकाशराणी : रत्नागिरी २३.५.७९ ■ तू अनावृत्त : १०.८.७९ : कोल्हापूर सकाळ : १८ जुलै १९८२ ■ भल्या सकाळी : २४.४.८० : आयुध दिवाळी १९८२, कविवर्य : १५.७.८० ■ अटक-मटक : २२.०२.८० : आयुध दिवाळी १९८२, अभियान मे १९८७ ■ गंधवेणा : २०.२.८० : साम्यवादी दिवाळी : १९८२ ■ तिळफुलांच्या शेतात : २१.९.८२ : आरती : जाने. १९८३ ■ प्रवासी जलाचा : २६.९.८० : आरती अंक : ३ जुलै १९८३ ■ झाड : १.२.८१ : अस्मिता : डिसें. ते फेब्रु. १९८३ ■ मोर : १२.९.८२ : अस्मिता : डिसें. ते फेब्रु. १९८३. ■ धुकं : १२.९.८२ : अस्मिता : डिसें. ते फेब्रु. १९८३, अनुष्टुभ दिवाळी १९९० ■ सून गेली फाशी : – किर्लोस्कर : सप्टें. १९८४ ■ सूर्य कोवळा रुजतो : – किर्लोस्कर : सप्टें. १९८४ ■ निळा नग्न धारांत : – किर्लोस्कर : सप्टें. १९८४ ■ कवतिक :- किर्लोस्कर : सप्टें. १९८४ ■ तिर्कटून आभाळात : – दै. सागर दिवाळी १९८४ ■ गोडाऊन : – अक्षर चळवळ ऑक्टो-डिसें. १९८५ ■ न्हवरदेव सोबवली : – : देवदुर्ग दिवाळी १९८५, झिनझिनाट पृ. १७ ■ जल्मा येव्चा, पंढरी जाव्चा : – दीपावली १९८५, झिनझिनाट पृ. ३१ ■ सुमलालय मगो आकडाक लागला : – सिंधुदुर्ग दिवाळी ८५/झिनझिनाट पृ.९ ■ बेवल्याक आसा ठावक : – आयुध दिवाळी : १९८५, झिनझिनाट पृ. २२, साहित्य मंथन दीपावली १९८७ ■ पाच कविता : – आरती दिवाळी : १९८६ ■ ती नियती कोण दिवानी : – लालमाती : १९८६ ■ हे स्तब्ध पाणी : – लोकप्रभा : २१ डिसें. १९८६ ■ पक्षी उडून नाहीत जात : – लोकप्रभा ■ तो धर्म कुणाचा ?: – लोकप्रभा ■ आता पांढरे शुभ्र पोपट- : लोकप्रभा / अभियान मे ८७ ■ म्हणून म्हणतो : – लोकप्रभा ■ प्रश्न :- लोकप्रभा ■ नाही आणि होय : –लोकप्रभा ■ सांज झाली : – मुंबई सकाळ : रविवार ९.८.८७ ■ तू तरी सांगशील का? :- लोकसत्ता : २१.१०.८७ ■ झंकार : – मुंबई सकाळ : रविवार ४.१०.१९८७ ■ बायो माजा न्हवला खय : – दीपावली, झिनझिनाट पृ. १० : १९८७ ■ आम्ही नाटके – नाथ पै एकांकिका स्पर्धा स्मरणिका, झिनझिनाट पृ. ३२ : १ जाने. १९८८. ■ झिनझिनाट : – दीपावली १९८८. झिनझिनाट पृ. १९. ■ वेल : – हंस दिवाळी : १९८८ ■ नारोपास्टो : – वैनतेय दिवाळी : १९८८. ■ आपलं सालं : – प्राजक्त : मे – जून १९८९ ■ शीटी : – कवितारती : झिनझिनाट पृ. १२ : मे – जून १९८९ ■ तांडव :-तरूण भारत (पुणे), असर चळवळ : दिवाळी १९८९, मे – जून १९८९ ■ सोबत आमची जोडी : – दीपावली १९८९ झिनझिनाट पृ. २१ ■ नि:शब्द :- प्राजक्त दिवाळी : १९८९ ■ कॅन्सर : – अक्षर चळवळ , साहित्य सागर दिवाळी १९९१ : मार्च ,

एप्रिल, मे, जून १९९०/ ■ सावल्या :- कवितारती : मे, जून १९९० ■ एकात्मता- ज्वाला : दिवाळी १९९० ■ काही खरं नसतं : - कविताश्री दिवाळी : १९९० ■ तुझा सर ... अदृष्याच्या वाटेवर :-नित्यसागर दिवाळी : १९९० ■ धावा : -मुंबई सकाळ , : रविवार ४.११.१९९० ■ अनंत गोपाळ सावंत : - अस्मितादर्श : मे, जून १९९१. ■ कोडे : - मुंबई तरुण भारत दिवाळी : १९९१. ■ सुरूंग :- साप्ता. किल्लेरायगड दिवाळी : १९९१ ■ पांडुरंग कंडक्टर : - अस्मितादर्श. : जा-फे-मार्च १९९२. ■ उत्सव : - अनुष्टुभ. : मे-जून १९९२ ■ माणसे - लोकमत:२६सप्टें १९९२ ■ डाव : -साप्ता. सकाळ. : २४ ऑक्टो. १९९२ ■ तापाच्या भरात :- चैत्राली दिवाळी : १९९२ ■ तुकाराम आज असता : - ? ■ तुझा नीरव पायरव : -? ■ नाही चढू दिले अन् ना उतरू दिले (विडंबन गीत) : विवेक दिवाळी : १९८२ ■ मी असा त्या बासरीचा सूर होतो : " " ■ घालू नका फुलांनो आता मला उखाणे : " " ■ तुझा मी हात प्रेमाने : " " ■ कोण जाणे काय ते बोफोर्स आहे. : " " ■ माणसे : - केसरी दिवाळी : १९९२ ■ डाव : -साप्ता. सकाळ : ऑक्टो. १९९२ ■ उजळले दिवे : - किशोर : एप्रि. मे. १९९३ ■ हा अथांग आकाश घुमट : - अभिधा दिवाळी : १९९२ ■ कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी ९३ ■ तरी विहीरीला दया : -अनुष्टुप : जाने-फेब्रु. १९९३ ■ संतुष्टता : - अनुष्टुप : जाने-फेब्रु. १९९३ ■ शहरात गाड्या उंडारतात : - विवेक दिवाळी : १९९३ ■ दिवे गेल्यावर : -सुगंधसरिता दिवाळी :१९९३ ■ म्हाताऱ्या पर्वतांच्या सुरकुत्या : " सुरक्षितता : " ■ हे स्तब्ध पाणी : " ■ मोहोळ - मुंबई सकाळ : रविवार १३ नोव्हें. ९४ ■ निरोप : - केसरी दिवाळी, दै. केसरी (सांगली) :९४, नोव्हें. ९४ ■ झुज : - मौज दिवाळी : १९९४ ■ पहारा :- मिळून साऱ्याजणी दिवाळी : ९४ ■ रस्ता : - मुंबई तरुण भारत दिवाळी : ९४ ■ पूर्ण-अपूर्ण : - विवेक दिवाळी : ९४ ■ लोक हलत नाहीत : - सुजन : नोव्हें-डिसें. ९४ ■ होतो मीही दरबारात तुझ्या रुजू - सुगंध सरिता दिवाळी : ९४ ■ बेबंद : - लोकसत्ता दिवाळी : ९५ ■ रात्री-बेरात्रीचे भास : - अक्षर दिवाळी : १९९६ ■ ते बोलत नाहीत काहीही : १०.११.१९९६ ■ हृदयात झाड : - विवेक नोव्हें. : १९९६ ■ कवतिक: - तरंग दिवाळी : १९९६ ■ झरिया : - मराठवाडा दिवाळी : १९९६ ■ पाऊस : - सुगंध सरिता दिवाळी : १९९६ ■ चांद टिपूर : - साहित्य संगम दिवाळी : १९९६ ■ चंद्रकाया : - कार्तिक दिवाळी : १९९६ ■ मधुघट :- आरती: सप्टें. १९९६ ■ शिंपलीभर आशावाद : - मिळून साऱ्याजणी : १९९६ ■ माणूस कोठे बरे आहे ? : - साधना दिवाळी : १९९६ ■ भिंत : - चैत्राली दिवाळी : १९९६ ■ साहित्यात होईल नाव : - अंतर्नाद मार्च : १९९६ ■ डाव : - वादंग दिवाळी : १९९७ ■ कळ : - साहित्य संगम दिवाळी : १९९७ ■ आडोसा : - ऋतुरंग : १९९७ ■ उत्सव - पुरुष स्पंदन. दिवाळी : १९९७ ■ तापाच्या भरात :- सत्याग्रही विचारधारा दिवाळी : ९७ ■ जगण्याच्या इसवीसनात : - साहित्य जागर दिवाळी : १९९७ ■ इंटलेक्चुअल्स : - अंतर्नाद : मे. १९९७ ■ आपापल्या बादात : - प्रसंवाद दिवाळी : १९९७ सोसत रहा : = - लोकसत्ता : २ ४ ऑक्टो. १९९७ तसा उतरलो झेंड्याबरोबरच : - साधना दिवाळी : १९९७ ■ तांडव : - ऐसी अक्षरे दिवाळी : १९९८ ■ उन्हाळा : - चारचौघी दिवाळी : १९९८ ■ अधीर : - शब्द साहित्य दिवाळी : १९९८ ■ काय ते पत्रात लिवा : - संधीकाल दिवाळी : १९९८ ■ कुठे जीव जातो : - मुंबई तरुण भारत. दिवाळी : १९९८ ■ फिरस्ता - साहित्य संगम

दिवाळी : १९९८ ■ नव्या नव्या वाटेवर : – हंस दिवाळी : १९९८ ■ देश रिटायर झाल्यावर : – अंतर्नाद : ऑग. १९९८ ■ चालता चालता अचल झालात : – सुगंधसरिता दिवाळी : १९९८ ■ कविता म्हणजे : – अंतर्नाद : फेब्रु. १९९८ ■ प्रमाण घ्या वाढवून : – अक्षर दिवाळी : १९९८ ■ खूप उन्ह लागतंय काय ? : – दीपावली : १९९९ ■ सुबावरी– चारचौघी दिवाळी : १९९९ ■ छुयमुय – सुगंधसरिता दिवाळी : १९९९ ■ जाहली खुशी : – हिमाली दिवाळी : १९९९ ■ आबोलेचो वळे सार : – कोकणमणी दिवाळी : १९९९ ■ गणपती येतहत : – मिती दिवाळी : १९९९ ■ सुरेखा : – पुरुष स्पंदन : १९९९ ■ ऊन तान्हे : – कला-आविष्कार दिवाळी : १९९९ ■ आपण आपल्याच लोकांविरूद्ध ? : – साधना दिवाळी :१९९९ ■ कोकणचा राजा बाई... : – कोकण टॉप टेन विशेषांक : ९९ ■ तुझी वीर गाथा : – छात्र प्रबोधन : १ डिसें. १९९९ ■ ॲग्रो ॲडव्हांटेज : – रविवार सकाळ दिवाळी : ७ नोव्हें. ९९ ■ मी थकून गेलोय खूप : – अंतर्नाद दिवाळी : १९९९ ■ त्यांच्या एरियावर : – कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी : १९९९ ■ कुठे, मैफील सोडून गेला : – देवतश्री दिवाळी : २००० ■ अय्या... शय्या... : – स्वधरा दिवाळी : २००० ■ श्वास फुलांचा : – चिंतन आदेश दिवाळी : २००० ■ झांजर संध्याकाळी : – कार्तिक दिवाळी : २००० ■ जल्मा येवचा – योजक, झिनझिनाट पृ. ३१ : २००० ■ मज कोण आतुनी : – कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी : २००० ■ बेवंद : – सुगंधसरिता. दिवाळी : २००० ■ झुळुकसा : – सुगंधसरिता. दिवाळी : २००० ■ ड्रॉ मॅच : – कला आविष्कार दिवाळी : २००० ■ मनाचिये गुंती : –मिती : २००१ ■ गाव आणि जीव : – पुढारी : २००१ ■ झांजर संध्याकाळी: – कला आविष्कार : २००१ ■ श्रीसरस्वती वंदना :–इये मराठीचिये नगरी : २००१ ■ तुझा तूच आवाज : – साधना दिवाळी : २००१ ■ भाषा, कला आणि तान : – दीपावली : २००१ ■ जिवावर फास... : – कार्तिक दिवाळी : २००१ ■ सानली : – साहित्य जागर दिवाळी : २००१ ■ आठवण – तरुणभारत दिवाळी २००१ ■ कवी वसंत सावंत : अंत्यदर्शन. : कोकणमणी दिवाळी : २००१ ■ पुढे पुढे दिवस आणखी कठीण येत जातील.: मटा वार्षिक : २००१ ■ मुंबईच्या कविता (९) : – महानगर दिवाळी : २००१ ■ कविता प्रलयामधली : – साधना दिवाळी : २००२ ■ ऑस्कर – विस्कर : – आपलं उपनगर दीपावली: २००२ ■ चारोळ्या : – साहित्य. ऐसी अक्षरे दिवाळी : २००२ ■ चला मिल हो, चला निपू या. – मटा वार्षिक : २००२ ■ जिवलग आला : – देवतश्री दिवाळी २००२ ■ पत्र वाचले : – कृषीवल दिवाळी : २००२ ■ पाऊस तरुण भुलीचा– कला-आविष्कार दिवाळी : २००३ ■ पारा : – जाणीव दिवाळी : २००२ ■ नाही वारा...नाही पाणी... : विपुल दिवाळी : २००२ ■ हुंकार साधा : – कार्तिक दिवाळी : २००२ ■ गावाच्या बाजूने : – मुंबई तरुण भारत दिवाळी : २००२ ■ वेशुद्ध : – दीपावली : २००२ ■ गावा सोडले तुला : – कोकणमणी दिवाळी : २००२ ■ कृष्णा एंटरटेन्मेंट : – लीलाई दिवाळी : २००२ ■ मिस टायकलवाडी (विडंबन) : लोकमत दिवाळी : २००२ ■ द सेल्युलर फोन यू हॅव कॉल (विडंबन) : सकाळ दिवाळी : २००२ ■ दिल्या घेतल्या वचनांची (विडंबन): लोकसत्ता हास्यरंग : ऑक्टो. २००३ ■ (पुन्हा) मुंबईच्या कविता (७) : महानगर दिवाळी : २००२ ■ झिम्मड :कार्तिक दिवाळी : २००३ ■ एकटी गाते : आपले छंद दिवाळी : २००३ ■ चंद्र हा अजुनी तरंगत : साहित्य दिवाळी : २००३ ■ गाणे उदास होते : जनप्रवाह दिवाळी : २००३ ■ दोन कर्णिका : लीलाई दिवाळी : २००३ ■ दर्द जोवर : दैवतश्री

उदास होते : जनप्रवाह दिवाळी : २००३ ■ दोन कर्णिका : लीलाई दिवाळी : २००३ ■ दर्द जोवर : दैवतश्री दिवाळी : २००३ ■ मिसळ भिनत चाललीय : साधना दिवाळी : २००३ ■ प्राण नाही छापला : तरुण भारत दिवाळी : २००३ ■ असे कसे झाले : कृषीवल दिवाळी : २००३ ■ समागम : मुक्त संवाद दिवाळी : २००३ ■ परमेश्वराच्या काठीचा आवाज : दीपावली : २००३ ■ मुंबईच्या कविता : महानगर दिवाळी : २००३ ■ पावसात भिजताना: आपले छंद दिवाळी : २००४ ■ शर्यत : गावकरी दिवाळी : २००४ ■ काही न बोलता : - ■ राजीनामा: मटा वार्षिक : २००४ ■ जुळत रहा : तरुण भारत दिवाळी : २००४ ■ मुंबई अभंग : सुगंध सरिता दिवाळी २००४ ■ छिन्न खंड : कला आविष्कार दिवाळी : २००४ ■ हे एक गाव : सुवार्ता-नाताळ : २००४ ■ गाऊस नको ना म्हणतो (विडंबन) : साधना दिवाळी : २००४ ■ राधा गौळण करिते चिंतन : कृषीवल दिवाळी : २००४ ■ गायनिकॉलजिकल : लोकमत दिवाळी : २००४ ■ देवा-धर्माच्या गोष्टी : - दीपावली : २००४ ■ जिव्हारखूण - हंस दिवाळी : २००४ ■ ही देवा रे तुझी आसवे : - मुंबई टाइम्स संवाद मटा : १४ ऑग. २००५ ■ वाटेवर खोटे ही चँग चालले : - सामना दसरा विशेषांक : २००५ ■ शर्यत :- सुगंध सरिता. दिवाळी : २००५ ■ झिपरी : - आपले छंद दिवाळी : २००५ ■ मालग्या तुझी मेळती चिटी : - गोवा दूत दिवाळी, झिनझिनाट पृ. १६ : २००५ ■ त्रिकणिका : - लीलाई दिवाळी : २००५ ■ निमूट झोपी गेलो : - सुवार्ता नाताळ : २००५ ■ भातुकली - लोकमत दिवाळी ■ शीटी : - साप्ता. कोकण नायक ■ छिन्न खंड : - - ■ कृष्ण : - - ■ पाणी : - - ■ वारा : - - ■ घास : - - ■ घाट : - कवितारति : - ■ चिमणी मेली इवलीशी : - - ■ टेलिफोनवरून : - कवितारती : - ■ तुजवीण मज आता : - चैत्रेय : - ■ संत ठोकराम (टोपणनाव) : ■ शालजोडीतल्या कविता १,२,३ : आमचं दिनांक : १ मे १९९१

**नाटक**

पांढरे कावळे भाग २. (नाटकातील प्रवेश २. बाबुराव रोखठोके या टोपणनावाने) आमचं दिनांक २४ जून १९९१). पृ. ७

**नभोनाट्य**

१) माझी मनिऑर्डर आहे का? (रत्नागिरी केंद्रावरून सादर. आकाशवाणी वार्षिक पुरस्कार प्राप्त) २) लक्ष्मी-नारायण. (रत्नागिरी केंद्रावरून १६ सप्टें. १९९० रोजी दुपारी १.०० वाजता प्रसारित) ३) आय मस्ट डाय ४) आणखी किती अंबादास. (सत्य घटनेवर आधारित विशेष रुपक. २७ डिसें. १९९१ रोजी सकाळी ७.१६ वाजता प्रसारित.) ५) आडाचं पानी लई खोल. (राष्ट्रीय पुरस्कार.)

**कथा**

१) बय. म. टा. १९ एप्रि. १९८१ पृ. २. २) सारं आभाळ ढगाळ. रविवार सकाळ, कोल्हापूर, २५ एप्रि. १९८२. पृ. ५ ३) वेडी. दै. पुढारी २५ एप्रि. १९८२. पृ. ४ ४) चार असरं. सिंधुदुर्ग दिवाळी १९८३ पृ. १०-१६ आणि ११२-१२७. ५) खरे बाबा, खोटे बाबा. लोकप्रभा. ७ जुलै १९८५. पृ. ५२-५४ व ५९. ६) मुंडल्यांचे घर. लोकप्रभा १ डिसें. १९८५ पृ. ३९-४२.७) घोर. साप्ताहिक सकाळ. १५ ऑक्टो. १९८८. पृ. १४. ८) जय जय पांडुरंग हरी. मटा. २९ जाने. १९८९ पृ. २ ९) अजुनि पाहतेच वाट. लोकसत्ता २ एप्रि. १९८९ पृ. १२ १०) बंडखोर. साप्ता. सकाळ. १४ एप्रि. १९९०. पृ. ३४-३७ व ४४-४५. ११) आणखी एक दांडी यात्रा. (विनोदी) ज्ञानसावली दिवाळी १९९१. पृ. ३४-३८. १२) लेखकाचं घर. सुगंध सरिता. दिपावली

दिवाळी. १९९२. पृ. ३४-३६. १४) एकी एके एक. पलाश दीपावली विशेषांक १९९२. पृ. १०६-१११. १५) मुंबईचे वर्णन १९९८. मटा वार्षिक १९९८. पृ. ८४-९१. १६) कणकवलीचे नग. कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी १९९८. पृ. २४८-२५२ १७) तिसरा सामना. सुगंधसरिता. दिवाळी विशेषांक. १९९९. पृ. ४७-५४.

१८) घेऊ चंद्र उशाला. ऋतुरंग दिवाळी २००१. पृ. १४६-१५१. १९) पान्हा. सिंधुदुर्ग. - पृ. १८-२२.

## लेख

### ललित

१) ती माझी मैत्रिण. मुंबई रविवार सकाळ. ४ जुलै १९८२. पृ. ३.

२) घणघणती किणकिणती घंटा. निसर्गसेवक अभिजात दिवाळी. १९९०. पृ. १३६-१४८

३) 'वाईकर भटजी' करताना. सांज लोकसत्ता. २२ डिसें. १९९१. पृ. ८ व १०

४) क्षण एक पुरे प्रेमाचा. अनुभव दिवाळी. २०००. पृ. २६-२७.

५) मालवणी मुलखात माझ्या कवितेची पाळं-मुळं. भाग १. तरुण भारत संवाद ७ ऑग. २००३. पृ. ४६-४७.

६) उमेदीतच कोकणात वाङ्मयीन पर्यावरण मिळालं. भाग २. तरुण भारत संवाद. २१ ऑग. २००३. पृ. ४६-४८.

७) मंगेश पाडगांवकरांसोबत अधून मधून. कुसुमाकर दिवाळी २००३. पृ. ५-७.

८) काविळीचे क्रमशः दिवस. असर दिवाळी २००५. पृ. १०५-११२.

९) रसरमण दमण.

## विनोद

१) रेमठ्याचे साहित्यसंमेलन. मटा. वार्षिक १९९६.पृ. १९०-१९५.

२) मुख्यमंत्री आरामचंद्र प्रभु यांची मुलाखत. सुगंधसरिता दिवाळी २००३ पृ. ८७-९०.

३) आतुर पॅटर्न ! ('साष्-टांग-नमस्कार' या सदराप्रमाणे शैली) मटा १५ फेब्रु. २००४.

४) प्रवाशांच्या शेवेसाठी. मस्त जाने. २००५ पृ. ४६-४८.

## प्रवास / स्थळवर्णन / उत्सववर्णन

१) उत्साहाचं पिसं (गणेशोत्सव - मालवणातील) महाराष्ट्र ११ सप्टें. २००० पृ. ९.

२) फोंडाघाटातली वळणं. महाराष्ट्र २५ सप्टें. २०००. पृ. २९ व ४५.

३) भूताखेतांच्या गजाली. महाराष्ट्र २३ ऑक्टो. २०००. पृ. ४०-४१

४) कार्तिक सेक्सी झालाय. महाराष्ट्र २७ नोव्हें. २००० पृ. ३६

५) घयकायले. महाराष्ट्र ११ डिसें. २००० पृ. ३३.

६) शेटाची नाय पत नि नाव गणपत. महाराष्ट्र २५ डिसें. २०००. पृ. ३३

७) महाराष्ट्राबाहेरचा माझा प्रवास. पाथेय दिवाळी २०००. पृ. ७-९.

८) कोकणातली होळी. लोकसत्ता १८ मार्च २००३. पृ. ४

९) परदेसी परदेसी जाना नही. भाग १. मस्त भटकंती मार्च २००५. पृ. ३४-३७.

१०) परदेसी परदेसी जाना नही भाग २ कुसुमाकर दिवाळी २००५. पृ. ३६-३८.

### व्यक्तिचित्रण/मुलाखती

१) मशाल धरली हाती तमाशाची. (पठ्ठे बापूराव यांच्या वयाला ११ नोव्हें. १९८१ रोजी ११५ वर्षे झाल्या निमित्त) रत्नागिरी टाइम्स ११ नोव्हें. १९८१.

२) मांगल्य अन् पावित्र्याचा मी नि:स्सीम पूजक (चिपळूण येथे दि. १९८५ रोजी नाटककार बाळ कोल्हटकर यांचा सत्कार करण्यात आला होता, त्यानिमित्त त्यांची घेतलेली दीर्घ मुलाखत) सागर ११ एप्रि. १९८५ पृ. ३.

३) राजा माणूस... भला माणूस. (राजा राजवाडे यांच्या अपघाती निधनाबद्दल वाहिलेली श्रद्धांजली) महानगर २३ जुलै १९९७. पृ. ५

४) मंगेश पाडगांवकरांसोबत २५ जुलै २००३ रोजी. (पाडगावकरांची मुलाखत) कुसुमाग्रज दिवाळी २००३. पृ. ९-१३.

५) अ. ला. सावंत गुरुजी. (कवी वसंत सावंत यांचे ज्येष्ठ बंधू व केळुसकरांचे शिक्षक मृत्यूला १० वर्षे झाल्यानिमित्त)

### समीक्षा : काव्य, भाषा विषयक व परीक्षणे इत्यादी

१) हजलची कैफियत. (गजल प्रकाराविषयी) आरती दिवाळी १९८८. पृ. ७३-७७.

२) मी आणि माझा बँडबाजा. महानगर ३ जून १९९५ पृ. ९ व १२

३) यंदाच्या दिवाळी अंकांतील कविता (आणि त्या अनुषंगाने) ललित जाने. १९९६. पृ. ४०-४५.

४) अंतरिचा कवनदिवा. (कालनिर्णय दिवाळी १९९८ मधील कविता - निवड व संपादन. त्यासोबत जोडलेले टिपण) कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी १९९८. पृ. १३०.

५) कविता सोबत नसती तर आत्महत्या केली असती. अंतर्नाद दिवाळी २००३ पृ. ४७-४९. (सोबत 'अंधाराचं प्रमाण घ्या वाढवून' व 'बाकी पाऊस' या दोन कविता)

६) लोकशाही शहाणी करणाऱ्या भाव कविता. (विष्णू सूर्या वाघ यांच्या 'फील गूड फेणी' संग्रहाची प्रस्तावना) महानगर २७ मार्च २००४ पृ. ११.

७) मराठी कवितेची नवी वळणे. कुसुमाकर दिवाळी २००४ पृ. २४-२६ (१९७५ नंतरच्या मराठी कवितेचा आलेख).

### नाटक

१) वरवरची रंग सफेती आणि 'मराठी अस्मिते'चा घोष. (अमेरिकेत जाणाऱ्या मराठी नाटकांच्या दर्जाविषयी) रुची अटलांटा विशेषांक जुलै २००५ पृ. १६ व २१ ते २४.

### भाषा

१) मराठीची प्रतिष्ठा. (पु. लं. देशपांडे यांनी पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुंना मराठीच्या उपेक्षेसंबंधी लिहिलेल्या पत्राच्या अनुषंगाने) दै. रत्नभूमी २८ सप्टें. १९८० पृ. ४.

२) आकाशवाणीवरील कार्यक्रम आणि भाषा. (१५ मार्च १९९८ रोजी मराठी संशोधन मंडळ, मुंबई तर्फे 'प्रसारमाध्यमे आणि भाषा' या परिसंवादात वाचलेला निबंध) अप्रकाशित.

### परीक्षणे

१) 'पु. लं. एक साठवण' ची आठवण. रत्नागिरी टाइम्स ६ डिसें. १९८१. पृ. ३.

२) काव्यात्मतेचा परीघ विस्तारणारी कविता. (सौमित्र यांच्या '... आणि तरीही मी' चे परीक्षण) महानगर १४ सप्टें. २००२.

३) उडू पाहणारी, पिंजऱ्यात फडफडणारी कविता. (प्रतिभा सराफ यांच्या 'मात्र एक नाही' चे परीक्षण) मटा ९ नोव्हें. २००३.

४) लोकप्रिय मराठी भावगाण्यांचा खजिना. गाणी! मनातली, गळ्यातली! आरती.

**इतर विषय**

**लोककला**

१) सिनेमातला तंबू. रविवार सकाळ २३ मे १९८२ पृ. ७.

२) धडपड - लोककला वाचविण्यासाठी. मटा ८ ऑग. १९९३. पृ. ५ व ७.

३) मालवणी मुलखातील लोककला जगायला हव्यात! तरुण भारत, बेळगाव. १५ सप्टें. १९९६ पृ. ६

४) कोकणची लोकरंगभूमी आणि आधुनिकता. साह्य. कोकण नायक. पृ. ९-१३.

**सामाजिक**

१) पोऱ्ये. (हॉटेलमधील बालकामगार) दै. पुढारी १३ जून १९८२.

२) हमाल. दै. पुढारी २४ ऑक्टो. १९८२.

३) दुसऱ्या स्वातंत्र्याचा गंजावात. (अण्णा हजारेंच्या आंदोलनाच्या संदर्भात) कालनिर्णय सांस्कृतिक दिवाळी २००३ पृ. १८८-१९०.

**शैक्षणिक**

१) शिक्षण आणि फस्ट्रेशन. रत्नभूमी ११ नोव्हें. १९८४.

**संस्था**

१) शारदोपासक मंडळ, मालवण. आरती वर्ष ८ - पृ. ९-१०.

२) -च्या मुळे 'डिंपल'! (डिंपल पब्लिकेशन, वसई विषयी २५ वर्षे झाल्याबद्दल) लोकमत २७ जुलै २००१.

**समालोचन/वृत्तांत/आढावा-लेख**

१) नाथ पै एकांकिका : भाविक रंगभूमीचा आणखी एक टप्पा. (एकांकिका स्पर्धा आयोजनाचा दहा वर्षांचा इतिहास) रत्नभूमी ५ एप्रि. १९८८.

२) प्रकाशन समारंभ वृत्तांत (प्रा. वैजनाथ काळे यांच्या 'तीन भिंती' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाविषयी) ललित मे १९९३. पृ. ५६.

३) कोकणची साहित्य संपदा. (आढावा) लोकप्रभा - साहित्य संमेलन विशेषांक ३० डिसें. १९९०. पृ. ५८-६०.

४) बारा-पाचाचा गणित थाक झाला. (मालवणी जत्रा, मुंबई वृत्तांत) आज दिनांक १९ नोव्हें. १९९४. पृ. ४-५ (रंगीत)

५) अलिबागचा साहित्यिक उन्हाळा. (कोमसाप चे संमेलन) आज दिनांक १७ मे १९९५. पृ. ५-६.

६) वैशिष्ट्यपूर्ण संमेलन. (कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेतर्फे दि. ३ व ४ जून १९९५ रोजी भरलेल्या तिसऱ्या संमेलनाचा वृत्तांत) मटा १८ जून १९९५. पृ. ५.

७) यंदाचे दिवाळी अंक : काही विशेष. वृत्तमानस ८ डिसें. १९९६. पृ. १२.

८) विंदांनी गाजवलेलं साहित्य संमेलन. (१३ ते १५ डिसें. १९९६ मध्ये सावंतवाडी येथे ४थे को.म.सा. संमेलन झालं. त्याचा वृत्तांत) महानगर १८ डिसें. १९९६ पृ. ५ व १२.

९) साहित्य संमेलनातील माझा सहभाग. (कवी म्हणून आलेल्या विविध संमेलनातील रोमहर्षक प्रसंगांवर) तरुण भारत २८ एप्रि. २०००. पृ. १३.

१०) वाचनसंस्कृतीचे मारेकरी. (साहित्य संमेलनात दि. २९ जाने. २००५ रोजी झालेल्या परिसंवादाच्या निमित्ताने) अंतर्नाद एप्रि. २००५. पृ. ३१-३५.

११) कवी संमेलनात 'जीव' आणण्याचा कानमंत्र. (७९ वे म. सा. संमेलनानिमित्त) लोकमत २८ जाने. २००६ पृ. ४.

१२) ---- (शिर्षक नाही. मराठी साहित्य संमेलनविषयक) आशय संमेलनांक जाने. २००६ पृ. ३०-३२.

१३) सोलापूर साहित्य संमेलनाच्या निमित्तानं (७९ व्या अ. भा. सा. संमेलन २७ ते २९ जाने. २००६ भरले होते, त्यानिमित्त) अंतर्नाद. मार्च २००६ पृ. ३५-३८. (सोबत 'मोबाईल व्हायब्रेटरवर' ही कविता चौकटीत.)

**पत्र**

१) ----- (ललित फेब्रु. १९९४ मधील प्रा. राम शेवाळकरांशी झालेल्या 'बातचीत' मधील मधु मंगेश कर्णिक यांच्या संबंधी आलेल्या विधानाचा खुलासा) ललित एप्रि. १९९४. पृ. ५०.

२) विकल साहित्यिकांचे सकल साहित्य संमेलन. (३० व ३१ जाने. १९९९, रोजी होणाऱ्या सकळ साहित्य संमेलनाच्या भूमिकेविषयी) मटा २६ जाने. १९९९.

३) लोकप्रिय कवितेचा 'नॉशिया' (सहलेखक अरुण म्हात्रे) ('नेमाडपंथ' विरुद्ध 'स्वामीपंथ' या गौरी देशमिवार - मटा २ सप्टें. २००१ - या लेखाला उत्तर) मटा ७ ऑक्टो. २००१. पृ. ११.

**प्रस्तावना**

१) मंदील (गझलसंग्रह) अशोक बागवे. २००२

२) तरणा पाऊस (काव्यसंग्रह) धोंडू पेडणेकर. २००४

३) फील गूड फेणी (काव्यसंग्रह) विष्णू सूर्या वाघ. २००४.

**सदर लेखन ऐल-पैल (महानगर)**

१) विश्वासच बसत नाही. (विश्वास पाटील) : ६.१०.२००० २) फक्त प्रल्हाद (प्रल्हाद चेंदवणकर) : १३.१०.२००० ३) झळक निरंजन (निरंजन उजगरे) : १०.११.२००० ४) एक फेस कॉन्फरन्स (हरिभाऊ विश्वनाथ) : १७.११.२००० ५) खाजगी वितरणासाठी (वि. रा. फडके) : २४.११.२००० ६) सदानंदी भाऊ (सदानंद विष्णू उर्फ भाऊ मराठे) : ८.१२.२००० ७) तदनंतर खंडेराव (हरिश खंडेराव) : १५.१२.२००० ८) जातिवंत सावंत (वसंत सावंत) : २२.१२.२००० ९) प्रदेश सावल्याचा ('समग्र केशवसुत' च्या निमित्ताने): २९.१२.२००० १०) नाही मनोहर अता (मनोहर कदम): १२.०१.२००१ ११) अनंता तुला कोण वाचू शके ? (अनंत सामंत) : १९.०१.२००१ १२) आमच्या वाडा मोखाड्याच्या प्रतिनिधीकडून (महेश म्हात्रे): २.२.२००१ १३) दे ना रे पुन्हा पुन्हा (अशोक बागवे) : ९.२.२००१ १४) ... इतकी काही मी मोठी नाही... इतकी लहानही नाही... (एकनाथ शिंदे) : १७.२.२००१ १५) श्री. नां. ची बेस्टकथा (श्री. ना. पेंडसे) : २३.२.२००१ १६) कुंडलिका भेटी । रंगब्रह्म आले ॥ (रमेश चौधरी) : २.३.२००१ १७) पिंगेज टेम्पासेस (रविंद्र पिंगे) : ९.३.२००१

१८) अंगद ते ग्वो मो खो (श्रीराम पांडुरंग कामत) : १६.३.२००१ १९) दोपहर की धूप में (मिर्झा गालिब) : २३.३.२००१ २०) शाम-ए-कुसुमाकर (शाम पेंढारी) : ३०-३-२००१ २१) वाचता वाचता लक्षवेधी (काही

वाचायला येणारा एक शिवसैनिक (वसंत तावडे) : १३.४.२००१ २३) मधु मंगेश ७० (मधु मंगेश कर्णिक) : २०.४.२००१ २४) बापट पसारा (विसुभाऊ बापट) : २७.४.२००१ २५) परेश शिवराम डोलवीकर (परेन शिवराम जांभळे) : ४.५.२००१ २६) बाकी राहिलेली देणी (नामदेव लोटणकर) : ११.५.२००१ २७) साळवी बाईंडर (सुरेश श्रीपत साळवी) : १८.५.२००१ २८) तरुण वाचक (सुबोध केमभावी) : २५.५.२००१ २९) फीड बॅक टु केमभावी (सुबोध केमभावी) : १.०६.२००१ ३०) स्वयम छाप घर (शाम गोखले): १५.०६.२००१ ३१) 'हायकू' वाले तोडणकर (मनोहर तोडणकर) : २२.०६.२००१ ३२) लगागा U ... लगागा (भीमराव पांचाळे) : २९.०६.२००१ ३३) छपाईच्या जगाचं भवितव्य काय! (NBT तर्फे झालेल्या परिसंवादाच्या निमित्ताने): ६.७.२००१ ३४) रानात झिम्म पाऊस (पावसाच्या मराठी कविता) : २०.७.२००१ ३५) फूटपाथवरुन प्रकाशपथाकडे (दिलीप काळे) : २७.७.२००१ ३६) सुरेख पुणेकर (सुधीर गाडगीळ) : १०.८.२००१ ३७) महाराष्ट्राबाहेरील मराठी 'वर्षा' व (महाराष्ट्राबाहेरील मराठी – २००१ या ग्रंथा निमित्त) : १७.८.२००१ ३८) अकरा दिवसांचा कवितेचा गणपती (मुंबईत झालेल्या काव्योत्सवा निमित्त) : ३१.०८.२००१ ३९)एका म्हाताऱ्याचं लक्षवेधी चऱ्हाट (एस. एस. मराठे) : ७.९.२००१ ४०) आय.टी. मराठी आणि गावाकडची शेती वगैरे (भास्कर सापळे) : १४.९.२००१ ४१) 'रुपारेल'चं सुवर्ण ग्रंथालय (प्रदीप कर्णिक) : २१.९.२००१ ४२) वकील भारतीय महाबळेश्वर (अॅड. महाबळेश्वर मोरजे) : ५.१०.२००१ ४३) तेचि अपुले 'उचित' (अरविंद दोडे) : १२.१०.२००१ ४४) वा वा वा- च च च – स्पती (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान) : १०.११.२००१ ४५) उणा पुरा गावठी बळीराजा (भगवान जाधव) : १६.११.२००१ ४६) हाडविरहित लोणी कोंबडी (एल.बी.चव्हाण) : ७.१२.२००१ ४७)निर्मळ वसई (कोमसासंची स्मरणिका) : २१.१२.२००१ ४८) रंगलेला 'कोकम' (कोकण कला अकादमी निमित्त) : ४.०१.२००२ ४९) कविमित्र प्रभाकर देवधर : १८.०१.२००२ ५०) निरोप (सदराच्या निरोपाचा लेख), साष्‌-टांग-नमस्कार (वृत्तमानस) : २.२.२००२.

या सदरातील लेखांचे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

<u>टोपण नावाने केलेले सदर लेखन</u> नवप्रकाशित (वृत्तमानस) निरभ्र (टोपण नाव)

ग्रंथपरिचयाचे सदर (प्रामुख्याने नवीन पुस्तके)

१) कॅप्सूल – रामनाथ सोनावणे, दुसरी खेळी – मोहन आळवे, होऊर – मंदाकिनी नाईक. ११ जाने. १९९८. पृ. ११. २) उपास – जयसिंग चव्हाण, उजेडाचे तुकडे – राजन साटम. १८ जाने. १९९८. पृ. ११. ३) चांदण्यातले झाड – उषा परब, भूतबाधा, मनोविकार आणि अंधश्रद्धा – प्रदीप पाटकर. २५ जाने. १९९८. पृ.११ ४) निंगोलीचं पान – रामनाथ म्हात्रे आणि मुकेश कांबळे, १ फेब्रु. १९९८ पृ. ११.

क्षण पळभर म्हणतिल... (वृत्तमानस) क्षणिक (टोपण नाव) व्यक्तीपर टिपणे

१) प्राध्यापकांची अक्षानेश्वरी. (वीणा देव), मृदुला प्रभुराम जोशी. ११ जाने. १९९८.

२) गिरिजा पुराण (गिरिजा कीर), काव्यवाचन कार्यशाळा. १८ जाने. १९९८.

३) 'मोरु' फॉर्मात ('आरती' मासिकातील प्रा. का. बं. वाडेकर यांच्या सदरावर टीका) २५ जाने. १९९८.

४) 'इंटरनेट' वर कविता. (निनाद प्रधान यांनी

इंटरनेटसाठी शूट केलेल्या कवी संमेलनासंदर्भात) १ फेब्रु. १९९८.

५) ऐना लायक पुरे. (जी. के. ऐनापुरेंच्या दोन कथांबाबत. 'आत्मचरित्राचा फाफटपसारा' आणि 'कोपिष्ट माणसाचा आवाज') ८ फेब्रु. १९९८.

६) आ.ना. ७० (आ.ना.पेडणेकर) १५ फेब्रु. १९९८.

७) डोंबिवलीचा इतिहास.

**जनाची नाही मनाची ! (वृत्तमानस)**

**मानसपुत्र (टोपण नाव)**

१) नायगावकर पन्नाशीत. २९ डिसें. १९९६. पृ. ५

**पाचामुखी (महाराष्ट्र टाइम्स) परमेश्वर (टोपण नाव)**

१) पोल मॅहाजनेजर. (प्रमोद महाजन) १८ मार्च २००४.

२) अकलाते यांनाच मते द्या. (अब्दुल करीम लाडसाब) २१ मार्च २००४.

३) 'आबा' धुवी. (आर. आर. पाटील) २६ मार्च २००४.

४) रोजगार हमी घराणे. (सोनिया गांधी) २८ मार्च २००४

५) आहे मनोहर तरी. (मनोहर जोशी) १ एप्रि. २००४

६) अरुणोदय झाला. (अरुण गवळी) ४ एप्रि. २००४

७) मामु तुम्हारा चुक्याच. (ए. आर. अंतुले) ८ एप्रि. २००४

८) गोविंदाची रामहंडी (सिनेनट गोविंदा) ११ एप्रि. २००४

९) बिनकाट्याचं घड्याळ. (शरद पवार) १८ एप्रि. २००४

१०) ऐसे बेकैद लोकांस होऊं न देणे. (छ. शिवाजी महाराज) २२ एप्रि. २००४

११) गुड गुड कवियॉज (अटलबिहारी वाजपेयी) २ मे २००४

१२) हे आराम. (उद्धव ठाकरे) ६ मे २००४.

१३) दावेदार (पंतप्रधान पदाचे) १३ मे २००४.

(उर्वरित भाग पुढील अंकात)

सूची संकलन
**डॉ. प्रदीप कर्णिक**
ग्रंथपाल, रुपारेल महाविद्यालय,
मुंबई.

**'दिशा' संपर्क**

**विद्या प्रसारक मंडळ,**

डॉ. बेडेकर विद्यामंदिर, तळमजला,

नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

दूरध्वनी - ०२२२ ५४२६२७०

# कथा विकास व १९४० पर्यंतची मराठी कथा धावता दृष्टिक्षेप (लेखांक ३)

*कथेचा व प्रामुख्याने मराठी कथेचा विचार करताना, याबाबत संशोधन करताना केलेले हे लेखन आहे. या संशोधनाचे मार्गदर्शक प्रसिद्ध समीक्षक कै. प्रा. ल. ग. जोग हे होते. – संपादक*

**नारायण सीताराम फडके**

१९२६ पासून ना. सी. फडक्यांनी कथालेखनास सुरुवात केली. त्या कथा व कादंबरी साहित्यात तंत्रशुद्धता व डौलदारपणा प्रामुख्याने दिसून येतो. तंत्राला फडक्यांच्या लेखी फार महत्त्व होते. लघुकथेच्या तंत्राबद्दल लिहिताना त्यांनी म्हटले आहे, ''तंत्राचे यथार्थ ज्ञान असणे व ते आपल्या कृतीत पूर्णपणे उतरविणे हा ललित लेखकाचा एक आवश्यक गुण आहे, किंवा अनेक प्रसंगांची चतुराईची मांडणी किंवा गुंफण म्हणजे ललित कथा.'' या दृष्टिकोणामुळे सुरुवात, मध्य व शेवट परिणामकारक झाला पाहिजे याबद्दल ते सतत दक्ष असल्याचे दिसते. किंबहुना ''... कुणाचीही कथा चांगली ठरते तेव्हा तंत्रकौशल्याचा गुण त्या कथेत असतोच असतो...'' अशी त्यांची धारणा होती. फडके खांडेकरांच्या पिढीने तंत्राचा बडिवार माजविला हा या कालखंडानंतरच्या नवकथा लेखकांचा आरोप. त्यांनी त्या लेखकांच्याही चांगल्या कथा कशा तंत्रबद्ध आहेत हे दाखवून खोडून काढला आहे. त्यांच्या तंत्रकौशल्याचे विशेष म्हणजे उत्कंठा वाढविणारे रहस्य, पात्र व प्रसंगांचा मितव्यय हे होत! अपूर्व दीपोत्सव, शोभेसाठी, ऑपरेशन अशा त्यांच्या विविध कथेतून ही तंत्र शुद्धता आढळून येते.

तंत्राबरोबरच भाषेची देणगी हाही फडक्यांच्या लेखनाचा विशेष होय. कादंबरीपेक्षा कथा हा साहित्यप्रकार वेगळा आहे, त्याचा अस्तित्व हेतू निराळा आहे याची फडक्यांना चांगलीच जाणीव होती. लालित्यपूर्ण भाषा ही त्यांनी मराठी कथेला दिलेली मोठीच देणगी म्हणावी लागेल. त्यांच्या आधीच्या कालखंडातील भाषा बोजड, पाल्हाळिक, जड व पल्लेदार वाक्यांनी युक्त अशी होती. या उलट फडक्यांनी भाषाशैलीची लय अचूक हेरून वाक्यरचना सुटसुटीत, छोटी अशी केली.

बाह्यतंत्र व रहस्यपूर्ण मांडणीमुळे त्यांच्या कथा घटनांनाच प्राधान्य देणाऱ्या असल्या, तरी व्यक्तिचित्रण हा भागही त्यांनी जोपासला. त्यांच्या काही व्यक्तिचित्रणात्मक कथांतूनही त्यांनी रेखाटलेली व्यक्तिचित्रे परिणामकारक आहेत. मीरा, गुलामांचे राज्य, लाडकी लक्ष्मी अशा काही कथा या संदर्भात उल्लेखनीय आहेत.

असे असले तरी वास्तव जीवनापासून त्यांची कथा दूरच होती. त्यांच्या लेखनाच्या मर्यादा, तंत्राचे त्यांना वाटणारे अवास्तव महत्त्व स्पष्ट करते. त्यांच्या विषयात विविधता असली तरी या वैविधाचे प्रमाण कमीच. प्रेम व विवाहपूर्व प्रेम हा सर्वसाधारपणे त्यांच्या कथेचा स्थायीभाव. यामुळे त्यांच्या कथा मानवी जीवनाचे सखोल दर्शन घडवू शकल्या नाही. कलेकरिता कला या मतप्रणालीचे फडके अध्वर्यु असल्याने, त्यांचे जीवनदर्शन कमालीचे संकुचित आहे. तंत्रप्रियतेमुळे त्यांनी कथेचे बाह्यांग बदलण्यात यश मिळविले असले तरी, ''कथानकाच्या चमत्कृतिपूर्ण गुंफणी पेक्षा हळुवार हाताने केलेल्या चिरंतन भावनांच्या आविष्काराने लघुकथेमध्ये अधिक सखोलपणा व सामर्थ्य येते...''' हे ते करू शकते नाहीत या तंत्र प्रियतेमुळेच दिवाकर कृष्णांना साधलेले मानवी मनाचे चित्रण फडके करू शकले नाहीत. किंबहुना ''दुसऱ्या महायुद्धाच्या

करू शकले नाहीत. किंबहुना ''दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभी ...(वाचकासमोर) प्रसाधन करून आले पाहिजे, त्याचे मनोविनोदन करणे, त्याला सत्प्रवृत्त करणे, त्याला एका कल्पनाराय जगात नेऊन सुख देणे यासाठीच जणू आपले जीवित आहे असे मराठी कथा मानीत होती'' या अभिप्रायाला बऱ्याच अंशी फडके, खांडेकरांची साचेबंद (!) कथा कारणीभूत ठरते.

१९४५ पर्यंत फडक्यांच्या कथांचा खरा बहर होता. त्यांनी शेवटपर्यंत आपले लिखाण अव्याहतपणे चालू ठेवले होते. परंतु त्यांना स्वत:ला त्यांच्या लिखाणाचा साचा ठरून गेला आहे, या टीकेची जाणीव होती. १९२०-२५ पर्यंत विस्कळित अवस्थेत असणाऱ्या कथेला आकर्षक आकार त्यांनी दिला व एकूण मराठी कथेच्या विचारात कथेच्या बाह्यांगात आमूलाग्रबदल करण्याचे ते मानकरी ठरले. म्हणूनच म.ना.अदवंतांनी, ''लघुकथेचा मंत्र जरी त्यांना जमला नाही तरी त्यांनी रसिकांना लघुकथेचे तंत्र शिकविले'' असा अभिप्राय व्यक्त केलेला दिसतो.

### विष्णू सखाराम खांडेकर

१९२३ साली खांडेकरांची 'घर कुणाचे' ही कथा प्रसिद्ध झाली. 'जीवनाकरिता कला' या जीवनवादी विचार सरणीची परंपरा खांडेकरांनी वाहिली असल्याकारणाने केवळ मनोरंजनपर वा मनोविश्लेषणात्मक कथा लिहिण्यापेक्षा सामाजिक सुखदु:खांशी निगडित प्रश्नांचा परामर्ष त्यांनी अधिक समरसून घेतला. साहजिकच प्रश्नार्थक (Thematic) कथेकडे त्यांचा कल अधिक होता.

१९२५ ते ४१ त्यांनी अव्याहतपणे कथालेखन केले. नंतर ५-६ वर्षांनी त्यांनी थांबविलेले कथालेखन सुरू केले. या कालखंडाच्या संदर्भात खांडेकरांच्या पुढील लेखनाचा विचार प्रस्तुत ठरत नाही. त्यांच्या कथा लिखाणाचे प्रामुख्याने तीन कालखंड विचारात घेतले जातात. ते पुढीलप्रमाणे १९२५ ते १९३०, १९३० ते १९४१, १९४६ ते पुढे.

सुरुवातीच्या कालखंडातील त्यांच्या कथेवर ह.ना.आपटे व कोल्हटकरांचे संस्कार अगदी दाट होते. त्यांनीच स्पष्ट केल्याप्रमाणे ''लेखनाच्या बाल्यावस्थेत लेखक अनुभूतीपेक्षा अनुकृतीवरच भर देत असतो'' कल्पनारम्यता हा कोल्हटकर संप्रदायाचा विशेष लक्षात घेऊन त्यांनी पुढे म्हटले आहे, ''त्यामुळे माझ्या प्रारंभीच्या लेखनातून कल्पनारम्यतेच्या गुलाबाचा थोडासा सुगंध व त्याचे बरेचसे काटे आपोआप आले.'' या काळातील त्यांच्या कथा या हरिनारायण आपट्यांप्रमाणे पाल्हाळिक, अतिरंजित व अद्‌भुततेवर अधिक विसंबणाऱ्या होत्या. कोल्हटकर व गडकऱ्यांच्या शैलीचा परिणाम त्यांच्या शैलीवर दाट होता. कोट्यांचा अतिहव्यास, अलंकारांची हौस यामुळे कथांची बांधणी अघळपघळ व सैल झालेली दिसते. भावाचा भाव, शिष्याची शिकवण अशा सर्वच कथा त्यांनीच व्यक्त केलेल्या अनुकृतीच्या जाणीवेचे प्रत्यंतर देतात. त्यांच्या मते त्यांच्या कथा'' गुर्जरांचे जुने वळण व दिवाकर कृष्णांचे नवे वळण यात कुठेतरी उभ्या आहेत.'' त्यातील कृत्रिमता भडकपणा भावविवशता आदी दोषच प्रामुख्याने लक्षात येतात.

कथालेखन विकासाच दृष्टीने दुसरा (१९३०-४१) कालखंड हा महत्त्वाचा होता. तंत्रशुद्धता, अनुभवांची विविधता, कथानकाची बांधणी या सर्वांबरोबरच पहिल्या कालखंडात असलेले शैलीचे दोष त्यांनी जाणीवपूर्वक कमी केलेले दिसतात. निवेदन पद्धतीतही या दुसऱ्या कालखंडात त्यांनी प्रयोग केले. 'लघुकथा सृष्टीचे अनभिषिक्त सम्राट' म्हणून गौरव करून घेण्याइतपत त्यांनी आपली कथा बदलली, यावरून तिच्या विकासाचा अंदाज येतो.

खांडेकरांच्या या लोकप्रियतेचे मूळ त्यांच्या कथांतून आढळणाऱ्या सामाजिक जाणिवेत आहे. तत्कालिन जीवनातील सामाजिक मनाची स्पंदने तरुण पिढीच्या ध्येयवादाचे यथार्थ चित्रण, आर्थिक विषमतेवर त्यांच्या

ठरल्या. त्यांच्या विविध कथा चाळल्या असता त्यांनी हाताळलेल्या विषयवैविध्याची कल्पना येण्यासारखी आहे. अर्थात जीवनासाठी कला या त्यांच्या दृष्टीमुळे ही विविधता सामाजिक जाणीवेपुरती मर्यादित आहे. ध्येयवाद, गरीब व गरिबी या विषयीची कणव, दांभिकतेची तिडीक, स्त्री जीवनातील विविध समस्या, आर्थिक विषमता या सर्वांवर त्यांनी सखोलपणे विचार केलेला दिसतो. ''जग गरिबांचे नाही, श्रीमंताचे आहे, माणुसकीचे नाही, मायेचे नाही सत्याचे नाही, ते व्यवहाराचे आहे '' अशा सुभाषितवजा वाक्यांची बरीच पखरण त्यांच्या या कथांतून दिसते. या स्वरूपाचेच कोणते ना कोणते चिंतनपर तत्त्व मांडण्याच्या त्यांच्या हव्यासामुळे व्यक्तिचित्रण हे प्रभावी झालेले नाही. त्यांच्या व्यक्ती या त्यांच्या विचारसरणीची प्रतीके म्हणून वावरतात. साहजिकच व्यक्तिचिणातील स्वाभाविकता निराळेपणा ते जपू शकत नाहीत. या काळातील 'आज आणि उद्या' 'अकल्पिता' 'धुळे' 'दोन कोणांचा' 'त्रिकोण' अशा काही कथांवरून वरील विवेचनाचे प्रत्यंतर येऊ शकते.

मराठी साहित्यात दिवाकर कृष्णांच्या नंतर नाट्यछटा हा प्रकार, अत्र्यांच्या नंतर विडंबन काव्य हा प्रकार तसेच खांडेकरानंतर रुपक कथा हा प्रकार बहुतांशी अविकसितच राहिला. अभिप्रेत असलेला प्रस्तुत कालखंडात कल्पनाविलास, काव्यात्मकता, सुचकता, तत्वप्रतिपादन असे अनेक विशेष असणाऱ्या नीतिकथा, काव्यकथा प्रतीक व दृष्टांत कथा या कथा प्रकाराचाही समावेश असलेल्या रूपक कथांचे कलिका व मृगजळातील कळ्या हे दोन संग्रह प्रसिद्ध झाले. काव्यात्म पद्धतीने अगदी थोड्या शब्दात व्यक्त होणारा मोठा आशय मनावर ठसविणाऱ्या या रूपक कथा हे खांडेकरांचे कथासृष्टीतील एकूण कार्यांचे स्वरुप पहाता वेगळेपणा म्हणावे लागते.

विनोद हा खांडेकरांसारख्या कथाकाराच्या प्रतिभेला न मानवणारा. खांडेकरांनी सुरुवातीला 'जांभळीची शाळा तपासणी, नंतर 'कढीभात' 'मार्क्स व फ्रॉईड', 'ओ हेनीचे मत' अशा काही विनोदी कथा लिहिल्या.

खांडेकरांना कथा लेखक म्हणून अमाप लोकप्रियता मिळाली. पण एकूण कथा साहित्याच्या इतिहासात फडके खांडेकर युग म्हणून जेव्हा या काळाचा निर्देश होतो तेव्हा या इतर मुद्यांपेक्षा केवळ करमणुकीत गुंतलेल्या मराठी कथेला, अपळपपळ झालेल्या कथेला या दोघांनी काही दिले म्हणून होतो. ''फडक्यांनी मराठी कथेला आकृती सौंदर्य दिले - ललित शैली दिली आणि तंत्राची जाणीव दिली... (खांडेकरांनी) कथेला आशय गर्भता दिली''.

### इतर काही लेखक

याच कालखंडात मराठी कथेची जडण घडण करणाऱ्या इतर काही प्रमुख कथालेखकांचीही दखल या प्रकरणात घेणे आवश्यक आहे. यशवंत मासिकात १९२९ साली 'एक रुपाय दोन आणे' ही कथा लिहून य.गो.जोशी पुढे आले. एकत्र कुटुंबपद्धती मोडकळीस येऊ पातलेल्या या काळात आपल्यावरील जुन्या संस्कारातून य. गो. जोशींनी अत्यंत जिव्हाळ्याने या मध्यवर्गीयपर कुटुंब पद्धतीतील, जीवनाचे दर्शन घडविले. कुटुंबातील विविध नात्यांतील जिव्हाळा हा त्यांच्या 'वहिनींच्या बांगड्या' 'शेवग्याच्या शेंगा', 'कोथिंबिरीच्या काड्या' वगैरे अनेक कथांतून ओतप्रोत भरलेला दिसून येतो. या मध्यमवर्गीय कौटुंबिक जीवनाच्या मर्यादित क्षेत्रात वावरणाऱ्या बहुतांश कथेबरोबरच तात्त्विक व चिंतनशील वृत्तीतूनही काही कथा त्यांनी लिहिल्या प्रवासी, धर्म ही अफू आहे अशांसारख्या काही कथा या सदरात येतात. कथेबरोबरच इतर साहित्य प्रकारांच्या तंत्रविचाराला मिळालेले अवास्तव महत्त्व लक्षात घेऊन म्यानवा तुकाराम आणि टेकनिक या कथेत जोशींनी या तंत्रांची चेष्टा केलेली दिसते खरी पण शेवटी त्यांच्या कथांचे ही एक तंत्र निर्माण झाले. जिव्हाळा हेच लघुकथेचे तंत्र या दृष्टीने त्यांनी लिहिलेल्या कथांतून पाल्हाळाचे

प्रमाणच अधिक दिसते. जुन्या संस्कारांचा प्रभाव असल्याने, असेल जोशींचा नव्या सुधारणांकडे पहावयाचा दृष्टीकोण हा सहानुभूती पूर्ण नव्हता. लेकरांची जिज्ञासा, पांजरपोळातील गाय वगैरे कथा या नवसुधारण्याची व संस्कारांची चेष्टा करण्याचा आहेत.

य. गो. जोशी यांच्या बरोबरीनेच कथा लिहून यशंवतमधूनच पुढे आलेले दुसरे कथाकार म्हणजे वि. वि. बोकील. अत्यंत विपुल असे कथालेखन बोकील यांनी केले. जोशांप्रमाणेच तरुण जोडप्यांच्या संसारिक चित्रांनी, कौटुंबिक जीवन वर्णनांनी बोकीलांनाही विषय पुरविले परंतु अनुभवाची ताकद बेताची असल्याने दृष्टिकोण व कथालेखन दोहोंवरही मर्यादा आली. जोशांच्या जीवनानुभूतीतील सखोलता बोकीलांना न साधल्याने वर्ण्य क्षेत्र एकच असूनही बोकीलांची कथा एकांगी, अतिरंजित रहाते.

१९२५ साली अनंत काणेकरांनी आपल्या कथा लेखनास सुरूवात केली. १९३०-३२ पर्यंतच्या त्यांच्या कथा कोल्हटकर संप्रदायात मोडतील अशाच भाषाशैली, पाल्हाळ वगैरे बाबत होत्या. १९३२ ते ३८ या काळात आपल्या कथांत विकास घडविण्याचे काम काणेकरांनी केले. घटनाप्रधान भाग मागे पडून या ६-७ वर्षात त्यांनी मानवी मनातील विसंगतीचा वेध घेणारे कथा लेखन केले. त्यांच्या कथेतून आढळणारे वास्तवाचे हे दर्शन, प्रभावी व्यक्ती चित्रे यामुळे त्यांच्या कथा उल्लेखनीय ठरल्या आहेत.

या शिवाय या कालखंडात र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ, भा.वि.वरेरकर, डॉ.वर्टी, खं.सा.दौंडकर, लक्ष्मणराव सरदेसाई, विनोद कथा क्षेत्रात चिं.वि.जोशी, ना.धो.ताहनकर, प्र.के.अत्रे व इतर काही कथा लेखिका होऊन गेल्या .

**१९४० पर्यंतची कथा-ऐतिहासिक पाहणी व निष्कर्ष**

१९२६ ते १९४५ अशी जरी या कालखंडाची मर्यादा असली तरी १९३९ नंतरची ४-५ वर्षे अत्यंत संथ गेली. दुसऱ्या महायुद्धाचे जे विदारक परिणाम एकूण समाजजीवनावर झाले, रचनेवर झाले त्यामुळे कथा रचनेच्या विचाराचा पुनर्विचार होऊ लागला. यातून नव्याच पिढीचा जन्म होऊ लागला. वामन चोरघडे कुसुमावतीबाई देशपांडे असे काही कथाकार या दोन्ही कालखंडाचे लेखक आहेत त्यामुळेच ही कालखंड मर्यादा ही केवळ विवेचनाची सोय होय!

या कालखंडास 'लघुकथा युग' म्हणून संबोधिण्यात येते. कथेच्या स्वरुपात आंतर्बाह्य बदल, याच कालखंडात घडून आला. अनेक लहानमोठे प्रसिद्ध अप्रसिद्ध कथाकार उदयास आले, त्यांनी आपापल्यापरीने कथेत भरही घातली. यामुळे मराठी कथाक्षेत्रात कथेचे पीक अमाप वाढले. संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक वाढही झाली. आशय, विषय, तंत्र, प्रकार निवेदन पद्धती, जीवन दर्शनाची तऱ्हा या सर्वच अंगानी विकसित होत गेलेली मराठी कथा या काळात दिसते.

यामागील मूळ कारण म्हणेज कथेकडे पहावयाचा दृष्टिकोण बदलला. हरिभाऊंपासून करमणूक मनोरंजन कालखंडापर्यंतच्या कथेच्या जीवनहेतूचा साकल्याने विचार करता प्रामुख्याने ते कथा सामाजिक सुधारणेच्या चळवळीला हातभार लावण्याच्या उद्देशाने लिहिली गेली होती. साहाजिकच तिच्या विषयाबरोबरच तिच्यातील स्वाभाविक अशा विकासाला मर्यादा पडल्या. वाचकाचे मनोरंजन करीत असतानाच त्याला सत्प्रवृत्त करणे, समाजसुधारणेसाठी अनुकूल बनविणे या हेतूंमुळे कथेला साधनरुप प्राप्त होऊन तिचा 'वापर' केला जाऊ लागला. वापर करणे या शब्दप्रयोगातून सुचित होणारा अर्थ इतका व्यावहारिक आहे की कोणत्याही साहित्य प्रकाराला या स्वरूपाचे प्रयोजन हे प्रगतीच्या दृष्टीने मानवणारे नसते.

साहित्याच्या प्रयोजन विचारात मतमतांतरे ही सुरुवातीपासूनच दिसतात. असे असले तरी या प्रयोजन विचारांचा जेव्हा वाजवीहून अधिक विचार साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेत केला जातो तेव्हा साहजिकच साहित्य प्रकारातील साहित्यिक मूल्ये ही नाममात्र उरतात. फडके खांडेकर कालखंडातील कथा ही प्रयोजनविचारापासून मुक्त नव्हती. जीवनाकरिता कला की कलेकरिता कला हा वाद या काळात झाला. असे असूनही कथेच्या अस्तित्व हेतूत प्रामुख्याने फरक पडला. या बदललेल्या भूमिकेत कथेचे साधनरुप कमी होऊन कथा ही जीवनदर्शनाच्या, अनुभूती सांगण्याच्या भूमिकेतून लिहिल्या गेल्या.

परिणामत: या कालखंडातील कथा अधिक अंतर्मुख बनली. बाह्य घटनांपेक्षा मानवी मनातील विचार वैचित्र्यातून जीवनार्थाचा शोध घेण्यासाठी कथा लिहिली जाऊ लागली. दिवाकर कृष्णांच्या कथेने हा जीवनदर्शनाचा प्रवाह सुरू केलेला दिसतो.

ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, रा. कृ. लागू, म. ना. अदवंत इत्यादी लेखकांनी आपल्या निरनिराळ्या ग्रंथातून, लेखांतून कथेच्या तंत्राचीही जाणीव बाहीस लावली. कथा अधिक आकर्षक करण्याच्या दृष्टीने सुरुवात, रहस्याची गुंफण, उकल, अनपेक्षित शेवट, उच्चबिंदू (climax) आदी टप्यांचा खोलवर विचार केला गेला. त्यामुळे कथा अधिक तंत्रशुद्ध रेखीव व आकर्षक बनली. तिच्यातील पाल्हाळ, विस्कळितपणा नाहीसा झाला. वर सांगितल्या प्रमाणे भूमिकेतील बदलामुळे घटनाप्राधान्याकडून मनोविश्लेषणाकडे कथा वळू लागल्याने व्यक्तिचिणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. व्यक्तिमनातील विचारसंघर्ष, स्वभावातील भावभावना आणि या सर्वांचा समाजाशी होणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया यांचे चित्रण कथेतून येऊ लागले. अर्थात मनोविश्लेषणात्मक कथेची ही सुरुवात असल्याने आज आढळणारा सखोलपणा या चित्रणात नव्हता. बहुतेक व्यक्ती या लेखकाच्या विचारांती होत्या, त्यामुळे त्यांच्यात प्रतिनिधिकत्व येऊन त्यातून काही नमुनेही (types) निर्माण झालेले दिसून येतात.

या काळातील कथेच्या निवेदन पद्धतीत झालेले बदलही लक्षणीय आहेत. गोष्ट सांगण्याची साधी व ढोबळ पद्धती मागे पडून वाचकाला आकर्षित करण्याच्या दृष्टीने निवेदन पद्धतीत जे काही प्रयोग झाले, त्यात संवादांचा प्रयोग महत्त्वाचा आहे. निवेदन पद्धतीतही सरळ कथानिवेदन करण्यापेक्षा अनुलोम पद्धतीचा अवलंब केला गेला. लघुकथेच्या संख्यात्मक वाढीचा परिणाम होऊन, कथा लिहिणारे समाजाच्या सर्वच स्तरातून पुढे आले. साहजिकच, कथेच्या आजपर्यंतच्या मध्यमवर्गीय स्वरूपात बदल झाला, आणि त्यामुळेच कथेत विविध प्रकार निर्माण झाले. खांडेकरांनी लिहिलेल्या रूपक कथा, प्रादेशिक वातावरणाच्या चित्रणावर भर देणारी वि. स. सुखटणकर सारख्यांची कथा, व्यक्तिचित्रणात्मक कथांचा वर्ग, य.शो.जोशीं सारख्या मध्यमवर्गीय एकत्र कुटुंबपद्धतीच्या संस्कारातून पुढे आलेली कौटुंबिक कथा, अयशस्वी ठरली तरी याच काळात झालेला भा. म. गोरे यांच्या लघुतम कथेचा प्रयत्न असे विविध प्रकार याच काळात लिहिले गेले, रूढ झाले.

गुर्जरकालीन मध्यमवर्गीय जीवनापलिकडे फारसे न जाऊ शकलेल्या, मनोरंजन व अद्भुततेकडे आणि बोधप्राधान्याकडे झुकलेल्या पूर्वकालीन कथेपेक्षा या काळातील कथेच्या विषय क्षेत्रात अधिक विस्तार झालेला दिसतो. समाजातील सर्व अर्थिक सामाजिक विविध जीवनांगांचे कलात्मक व वास्तवपूर्ण जीवन दर्शन या कथेतून घडून येऊ लागले. विषयांच्या वाढत्या व्याप्तीमुळे साहजिकच मागील कालखंडापेक्षा या काळातील कथेतून व्यक्त होणाऱ्या जीवनानुभवांत वैविध्य आले.

**दोन वाद व विषय वैविध्य**

विषयात झालेल्या वाढीचा स्थूल निर्देश वरील

## दोन वाद व विषय वैविध्य

विषयात झालेल्या वादांचा स्थूल निर्देश वरील विवेचनात आलेला आहे. विषयातील वैविध्य वाढले हे खरे असले तरी कलावादी व जीवनवादी विचारसरणीतील मतभिन्नतेमुळे कथेच्या विकासावर परिणाम झाला. ना. सी. फडक्यांनी कला ही कलेकरिताच असते अशी कलावादी विचारसरणी मांडली परिणामत: मागील कालखंडापर्यंत विस्कळित, पाल्हाळिक असलेल्या कथेत अधिक रेखीपणा आला हे खरे. परंतु त्यांचा तंत्रविचार आशयापेक्षा अभिव्यक्तीच्या कारागिरीलाच महत्त्व देऊ लागला. त्यामुळे कथेच्या परिणामात आवश्यक असणारी कथामूल्ये, की ज्यांच्यातून मिळणाऱ्या उत्कट कलात्मक आनंदासाठी कथेचा जीवन हेतू आहे, ती दुर्लक्षिली गेली. कथेच साचेबंदपणा आला, तिच्यातील कारागिरीच प्रमुख ठरतो. मग ही कारागिरी साध्य करण्याकरिता ''कोणताही विषय'' (''कथेला कोणताही विषय चालतो, फक्त तो निरगाठ गुंतागुंत उकल व कलाटणी या साच्यात चांगला बसला म्हणजे झाला'') या साच्यातून काढण्यात येऊ लागले.

कालवादी विचारप्रणालीचे विषय वैचित्र्यावर वरील परिणाम होऊन विषयाला महत्त्वच उरेनासे झाले. या उलट जीवनाकरिता कला या खांडेकरी संप्रदायाने कथा जीवनाभिमुख बनविली, विविध अनुभव वास्तवतेने कथेत आणले, हे खरे असले तरी जोवर या अनुभूतीत व अनुभूती व्यक्त करण्यात ताजेपणा होता, तोवरच ही कथा विषय वैविध्य जोपासू शकली. मुळातच कथा जरी समाजाच्या सर्व स्तरातून येऊ लागली होती, तरी बहुसंख्य कथालेखक हे मध्यमवर्गातून आलेले होते. त्यांच्या अनुभवांना, मर्यादा होत्या. अनुभवाच्या या मर्यादेमुळे सुरुवातीचा ताजेपणा कमी होऊन, जुन्याच अनुभवाची नवी आवर्तने घातली जाऊ लागली. याचा परिणाम म्हणूनच कथानकांचे सांगाडे जुळविण्याकडे, सवंग विषयाच्या हाताळणीकडे, व्यक्तिनमुने (types) निर्माण करून पुन्हा पूर्वकालीन कथेप्रमाणे बोध देण्याकडे काही कथालेखक वळू लागले.

या दोन टोकी वादांमुळे कथेच्या जीवनदर्शनाच्या क्षमतेतील सखोलता कमी होत गेली. तंत्राच्या बडिवारता आणि शिळ्या कढीला नवा ऊत आणण्याच्या हव्यासात एकूणच कथेत नवा बदल घडून येणे आवश्यक असल्याचा काळ येऊन ठेपला. १९३९ नंतरची चारपाच वर्षे संथ जाण्यात या दृष्टीने सूचकता व्यक्त होते. दुसऱ्या महायुद्धाने होरपळून निघाल्यानंतरच्या मराठी कथेने टाकलेली कात व धारण कलेले रूप हे कवितेप्रमाणेच अतिशय लक्षणीय आहे.

मोहन पाठक
ठाणे

*जोग सरांच्या निधनामुळे पहिली चार प्रकरणे अंतिम टप्प्यात येऊनही Ph.D. च्या संशोधनाचे हे काम थांबवले. या ६-७ महिन्यात झालेल्या लेखनावर टिपणांवर आधारित काही भाग येथे दिला आहे. आता हे लेख थांबवीत आहोत.*

# दूरदर्शन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीस मारक आहे का?

*दूरदर्शनचा वापर या विषयाला दोन बाजू आहेत. यातील वाईट परिणाम करणारी बाजू अधिक गडद आहे. याबाबत विचार मांडणारा हा लेख आहे. - संपादक*

दूरदर्शन संचाला "Idiot Box" असे म्हटले आहे. आजकाल बहुतेक घरांमध्ये मुले किंबहुना मोठी माणसे सुद्धा फावल्या वेळामध्ये दूरदर्शन संचासमोर तासन् तास बसलेली आढळून येतात. हे कितपत योग्य आहे? मोठ्या माणसांचे एकवेळ सोडून दिले, तरी संस्कारक्षम आणि अनुकरण प्रिय विद्यार्थ्यांचे, मुलांचे काय? त्यांच्या जीवनातील पायाभरणीचा, भावी आयुष्यासाठी बेगमी करण्याचा असा 'विद्यार्थीदशा' हा सर्वार्थाने महत्त्वाचा कालखंड असतो. याच बाल्याअवस्थेमध्ये आणि कुमारावस्थेमध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शारिरीक, मानसिक बौद्धिक, भावनिक, सामाजिक सर्वांगीण विकास होत असतो ह्या विकासामध्ये दूरदर्शन हा अडथळा तर ठरत नाही ना? दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहण्यामध्ये त्यांच्या होणारा कालापव्यय आणि तदनुषंगाने त्यांना व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने लाभणारा कमी वेळ, ह्याचा अनिष्ट परिणाम त्यांच्या अभ्यासातील प्रगतीवर आणि व्यक्तिमत्व विकासावर होत नाही ना? दूरदर्शनचे विद्यार्थ्यांच्या भावजीवनातील स्थान आणि महत्त्व, त्यांच्या सर्वांगीण उन्नतीस बाधक तर ठरत नाही ना?

नाईलाजाने आपल्याला या प्रश्नाचे उत्तर बहुतांशी 'होय' असेच द्यावे लागेल. विद्यार्थ्यांनी शरीरसंपदा कमवावी, आपले आरोग्य चांगले राखावे, त्यासाठी व्यायाम करावा, विविध खेळ खेळावेत, ह्या दृष्टीने हा महत्त्वाचा काळ असतो. परंतु आज आपल्याला काय चित्र दिसते? विद्यार्थी अभ्यासाव्यतिरिक्तचा वेळ दूरदर्शन पहाण्यात घालवतात. दूरदर्शनवर दाखविले जाणारे विविध चित्रपट रिमिक्स गाणी आणि नृत्ये, क्रिकेटचे सामने, कार्टून नेटवर्क वरील विविध कार्यक्रम पहाण्यापुढे बिचाऱ्यांना खेळावसे देखील वाटत नाही मग व्यायाम, योगासने, विविध कसरती ह्यासाठी वेळ कोठून काढणार आणि त्याची इच्छा तरी त्यांना कोठून होणार? फारशी हालचाल न करता एकाच जागी तासन्तास बसून राहण्याचा अनिष्ट परिणाम प्रकृतीवर झाल्याविना कसा राहील? त्यामुळे भावी आधारस्तंभ सुदृढ आणि बाळसेदार न दिसता 'आधारकाटक्या' वाटतात. दुसरी गोष्ट म्हणजे सतत दूरदर्शन वरील कार्यक्रम पहिल्यामुळे डोळ्यांवर ताण पडतो आणि विविध दृष्टिदोष निर्माण होतात. परिणामी अकाली चष्मा लावण्याची पाळी ह्या मुलांवर येते. आजकाल कुठल्याही शाळेमध्ये, कुठल्याही वर्गामध्ये, ५०/६० मुलांमध्ये अशी १५/२० 'स्कॉलर' मुले आपल्याला दिसून येतात. ज्यांना दिव्य दृष्टीचा लाभ झालेला असतो. ह्याचे एक कारण दूरदर्शन तर नसावे ना? अमेरिकेत सर्वेक्षणामध्ये ही गोष्ट सिद्ध झालेली आहे. दूरदर्शनला २५/३० वर्षे होऊन गेल्यावर त्या ठिकाणी विद्यार्थ्यांमधील दृष्टिदोष लक्षणीयरीत्या वाढलेले आढळून आलेले आहेत. दूरदर्शनवर कार्यक्रम पहात असतान आपली दृष्टी कधीच स्थिर राहू शकत नाही कारण दिसणारे दृश्य किंवा चित्रे ही सतत हालती असतात. रिमिक्स गाणी आणि नृत्ये ह्यांच्या चित्रीकरणाच्या बाबतीत तर बोलायलाच नको त्यावेळी आपली दृष्टी निमिषभर देखील टिकत नाही, स्थिर राहू शकत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे कार्यक्रम, पुरेसे अंतर राखुन, सुमारे १५/२० फुटावरून पाहिले पाहिजेत. परंतु हे आपल्या भारतासारख्या गरीब देशात कितपत शक्य आहे? दूरदर्शनचे

आकर्षण आणि इतर करमणुकीच्या साधनांचा अभाव शिवाय आजकाल मनोरंजन ही एक गरज मानली जात असल्यामुळे, गरिबाघरी देखील आपल्याला दूरदर्शन संच दिसून येतात. झोपडपट्टी मध्ये जिथे ८ x १० च्यां खोलीमध्ये माणसांना रहायला जागा नसते, अशा ठिकाणी दूरदर्शन वरील कार्यक्रम दुरून पहाणे कितपत शक्य आहे? परिणामी व्हायचा को अनिष्ट परिणाम विद्यार्थ्यांच्या दृष्टीवर होतच असतो त्यामुळे जी गोष्ट अमेरिकेमध्ये २५/३० वर्षापूर्वी घडली, तीच गोष्ट आपल्याकडेघडेल अशी सार्थ भीती वाटते.

दुसरी गोष्ट म्हणजे दूरदर्शन वरील कार्यक्रम पहाण्यामध्ये मुलांचा एवढा वेळ जातो, की त्यांचे वाचन जवळ बंद पडणाच्या मार्गावर आहे. 'वाचाल तर वाचाल' असे आपण म्हणतो आणि विद्यार्थ्यांच्या दृष्टीने 'वाचन' तर अधिक महत्त्वाचे आहे. वास्ताविक क्रमिक पुस्तकांच्या वाचनाबरोबर मुलांनी अवांतर किंवा पूरक वाचन करणे आवश्यक असते. पण आज आपल्याला काय चित्र दिसते? अभ्यासेतर वाचन तर सोडाच किंवहुना विद्यार्थी क्रमिक पुस्तकांचे देखील वाचन करत नाहीत असे दृष्टोत्पत्तीस येते. याचे प्रमुख कारण त्यांचा दूरदर्शन पहाण्यात बराच वेळ जातो. हा 'वाचन संस्कृती' वर घाला आहे. मुलांची वाचनाची आवड दिवसेंदिवस कमी कमी.होत चालली आहे. आणखी काही दिवसांनी त्यांची वाचनाची सवयच जाईल की काय अशी सार्थ भीती वाटते.

सर्वात वाईट गोष्ट म्हणजे दूरदर्शनचे विद्यार्थ्यांच्या भावजीवनानावरील आक्रमण असल्यामुळे त्यांच्या सामाजिक आणिमानसिक विकासामधील अडथळा वाढत आहे.

जागतिकीकरणामुळे जग जवळ येत चालले आहे, जगाचे एका खेड्यामध्ये (Global Village) रूपांतर झालेले आहे असे एकीकडे आपण म्हणतो. परंतु त्याचबरोबर माणसे एकमेकांपासून मनाने दूर जात चालली आहेत, त्यांच्या मधील भावनिक बंध क्षीण होत चालले आहेत असे विदारक चित्र आहे. मला वाटते, ह्या परिस्थितीला दूरदर्शन जबाबदार आहे. ह्यामुळे कुटुंबामधील व्यक्तींमधील संवाद देखील कमी होत चालला आहे. एखादी मालिका पहात असताना सर्वजण त्यात एवढे मशगुल होऊन गेलेले असतात, सगळ्यांची एवढी तंद्री लागलेली असते, की सगळे जणू काही आपले देहभानच विसरलेले असतात किंबहुना दूरदर्शन पहाणाऱ्या सगळ्या व्यक्ती या निर्जीव पुतळे आहेत आणि दूरदर्शन संच ही बोलणारी, हालचाल करणारी एकमेव जिवंत व्यक्ती आहे, असा आपल्याला भास होतो. काही व्यक्तींना तर दूरदर्शन वरील कार्यक्रमांचे एवढे अप्रूप असते की तो चालू असताना पाहुणे आले किंवा मित्र मंडळी देखील आली तरी त्यांच्याशी बोलायला ते नाखुष असतात. पालकांच्या ह्या वृत्तीचा अनिष्ट परिणाम मुलांच्या संवेदनशील मनावर झाल्यावाचून कसा राहील ?

तुम्हाला कदाचित असे वाटेल की दूरदर्शनची काळी बाजू तेवढीच मी रंगवीत आहे परंतु तसे मुळीच नाही. त्याला पांढरी किनार देखील आहे. काही कार्यक्रम अतिशय चांगले असतात, ते मुलांनी वेळात वेळ काढून, आवर्जून पहायला पाहिजेत. उदा:- Discovery, Animal Planet, National Geographic Channel वरील विविध माहितीपर कार्यक्रम, प्राणी, वनस्पती ह्यांची प्रत्यक्ष माहिती, तसेच इतर वैज्ञानिक आणि भौगोलिक माहिती. त्यामुळे विद्यार्थ्यांचे सामान्यज्ञान सुधारण्यास त्यांची मदतच होते. मराठी, हिंदी, इंग्रजी विविध भाषांमधून दिल्या जाणाऱ्या बातम्या देखील विद्यार्थ्यांनी अवश्य ऐकल्या पाहिजेत. त्यामुळे त्यांच्या वरील भाषांचा विकास व्हायला मदत होईल शिवाय प्रचलित घटनांचे त्यांचे ज्ञान देखील असा अद्ययावत होईल. एकंदरीत नियोजनपूर्वक विद्यार्थ्यांनी दूरदर्शन कार्यक्रम पाहिल्यास ते त्यांच्या सर्वांगीण प्रगतीस मारक किंवा बाधक न ठरता उलट पूरकच ठरतील.

श्री. प्र. द. अरदकर
सहशिक्षक, श्रीरंग विद्यालय, ठाणे.

# परिसर वार्ता

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### प्राणिशास्त्र मंडळ

प्राणिशास्त्र मंडळाच्या शैक्षणिक वर्ष २००६-२००७ चे उद्‌घाटन शनिवार दिनांक २२ जुलै २००६ रोजी करण्यात आले. या दिवशी मंडळाने एक प्रदर्शन आयोजित केले होते. प्रदर्शनाचे उद्‌घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी केले. प्रदर्शन Epidemiology या विषयावर होते. प्रदर्शनात एकूण १६ भित्तीपत्रके लावली होती. या बरोबरच निसर्ग चित्रांचेही प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनासाठी निसर्ग छायाचित्रकार श्री. युवराज गुर्जर यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. श्री. गुर्जर यांची छायाचित्रे नुकतीच आंतरराष्ट्रीय Spider Photo Exhibition साठी निवडण्यात आली आहेत. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. मनस्वी हिने तर आभारप्रदर्शन कु. कामाक्षी हिने केले.

### महिला गट (Women Cell)

महिला गटातर्फे Empowered Women या विषयावर डॉ. श्रीमती नंदिनी देशमुख, उपप्राचार्या आणि विभागप्रमुख कीर्ती महाविद्यालय यांचे व्याखान १८ जुलै २००६ ला आयोजित केले होते. व्याख्यानात त्यांनी आपल्या देशातील Female Feticide या मुद्यांवर भर दिला होता.

महिलांमध्ये असणाऱ्या दोन एक्स गुणसुत्रांमुळे महिला या पुरुषांपेक्षा मानसिक व शारीरिक दृष्ट्या मजबूत असतात हे त्यांनी व्यवस्थित पटवून दिले. विविध क्षेत्रातील महिलांच्या शौर्याबाबतचे चित्र त्यांनी रेखाटले. या व्याख्यानाला मोठ्या प्रमाणात अध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## अर्थव्यवहारातील गणित-व्याख्यानमाला

महाविद्यालयातील गणित व संख्याशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने दि. २६ ऑगस्ट २००६ 'अर्थव्यवहारातील गणित' या विषयावर एक दिवसाची व्याख्यानमाला संपन्न झाली.

चर्चासत्राचे उदघाटन मुंबई विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. साठे यांनी केले. उद्‌घाटनानंतर गणित व संख्याशास्त्र विषयाची व्यवहारातील उपयुक्तता त्यांनी स्पष्ट केली. दुपारच्या व्याख्यानात अर्थव्यवहारशास्त्रात निपुण श्री. चंद्रशेखर टिळक (उपाध्यक्ष एन. एस. डी. एल) यांनी आपल्या ओघवत्या शैलीत गणित शास्त्राशी निगडित क्षेत्रातील घडामोडी कशा घडतात त्याची गुंतागुंत प्रेक्षकांसमोर मांडली.

त्यानंतर डॉ. क्लिस्टन डिसिल्वा (संचालक, अल्टिना सेक्युरिटीस) यांनी शेअर व्यवहाराचे गणित या विषयावर प्रकाश टाकला. या व्याख्यानांचा विविध महाविद्यालयातील ७१ शिक्षक व विद्यार्थ्यांना लाभ मिळाला.

### माजी संघटना

शनिवार दिनांक १९ ऑगस्ट २००६ ला दुपारी ३.०० वाजता कथा कथन हा कार्यक्रम आयोजित केला होता. माजी विद्यार्थी श्री. शशांक रसाळ यांनी प्रसिद्ध मराठी लेखक श्री. व. पु. काळे यांच्या दोन गोष्टींचे कथन केले. सुरुवातीला प्रा. सौ. व्ही. व्ही. महाजन यांनी श्री. शशांक रसाळ यांची ओळख करून दिली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी भाषण केले आणि संघटनाची आवश्यकता कशी आहे हे पटवून दिले. त्यांनी यावेळी संयोजक प्रा. एस.जी. बापट यांना महाविद्यालयातील जुन्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधून

अधिकाधिक विद्यार्थ्यांना माजी संघटनेत आपले नाव नोंदवण्यासाठी प्रयत्न करण्याविषयी सांगितले.' या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा. व्ही. डी. गोलतकर (भौतिकशास्त्र विभागप्रमुख), प्रा. ए. डी. शेठ, डॉ. श्रीमती बोरकर आणि काही इतर प्राध्यापक प्रामुख्याने उपस्थित होते प्रा. डॉ. एम. जे. कोलेट यांनी आभारप्रदर्शन केले.

### रसायनशास्त्र मंडळ

रसायनशास्त्र मंडळाच्या शैक्षणिक वर्ष २००६-२००७ च्या कार्यक्रमांची सुरुवात बुधवार दि. ३० ऑगस्ट २००६ रोजी झाली. संयोजक प्रा. व्ही. एम. फेगडे यांनी सर्वांचे स्वागत करून प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी महाविद्यालयातील विविध कार्यक्रमांचे महत्त्व पटवून दिले.

सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. एस. एन. केळकर यांनी विद्यार्थ्यांना पदवी परीक्षेनंतर रसायनशास्त्रातील कारकीर्दीबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी स्वयंरोजगाराबाबत वेळेच्या नियोजनाची आवश्यकता याबद्दल विचार मांडले. प्रा. सदाशिव मेढेकर यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

### डर्बन परिषदेस डॉ. टेकाळे सहभागी

'गांधी डेव्हलपमेंट ट्रस्टने' डर्बन दक्षिण अफ्रिका येथे गांधी इंटरनॅशनल फाउंडेशन यु.एस.ए. व गांधी इंटरनॅशनल फाऊंडेशन नवी दिल्ली आणि आफ्रिका सरकार यांच्या सहकार्याने एक आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. ही परिषद गांधीजींनी १९०६ प्रथम साली केलेल्या काळा, गोरा वर्णभेद या सत्याग्रहाला १०० वर्षे पूर्ण झाली म्हणून आयोजित करण्यात आली होती. परिषद १० ते १४ सप्टेंबर २००६ रोजी तंत्रज्ञान विद्यापीठ डर्बन येथे झाली. या परिषदेत ६९ देशांमधून २२६ लोक सहभागी झाले होते.



डॉ. नागेश टेकाळे

डॉ. नागेश टेकाळे, प्रपाठक, जीवशास्त्र विभाग बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय यांना या परिषदेला वक्ता म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. नागेश टेकाळे यांनी इतर दोन वक्त्यांबरोबर त्यांचा ''ॲप्रोच ऑफ सत्याग्रहा फॉर प्रोटेक्टींग ट्रायबल राइटस् इन इंडिया: सक्सेस स्टोरी '' हा निबंध येथे सादर केला.

त्यांनी भारतातील काही यशस्वी झालेल्या सत्याग्रहांची माहिती दिली. केरळ येथील आदिवासी लोकांनी केलेला ४८ दिवसांचा सत्याग्रह, छत्तीसगड येथील सालवा जुडूम जमातीने नक्षलवाद्यांविरूद्ध केलेला सत्याग्रह, नर्मदा बचाओ आंदोलन या सत्याग्रहांची चर्चा केली. तसेच या निबंधात त्यांनी मोखाडा तालुक्यातील महिलांनी केलेला दारूबंदीचा लढा या सत्याग्रहाबाबत विशेष चर्चा केली. तसेच गांधीजींचे विचार व विमुक्त जमातींचे आदर्श व परंपरा यांची तुलनाही या निबंधातून सादर केली आणि गांधीजींच्या तत्त्वाचे मूळ कोठेतरी विमुक्त जमातींच्या समजुती परंपरांमध्ये दडलेले आहे हे त्यांनी दाखवून दिले.

### ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रम २००६-२००७

दिनांक १० सप्टेंबर २००६ रोजी ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २००६-२००७ चे उद्घाटन तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. डी. के. नायक यांच्या हस्ते झाले. त्यांच्या भाषणात त्यांनी ग्रंथालयांची आवश्यकता कशी आहे आणि ग्रंथपाल यामध्ये किती महत्त्वाचा असतो हे पटवून दिले. हा कार्यक्रम

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. त्यांनी ग्रंथपालाची कार्ये ही फक्त ग्रंथालयापुरतीच मर्यादित नसून महाविद्यालयातील इतर कार्यक्रमांमध्ये ग्रंथपालाची भूमिका कशी असावी याबाबत मार्गदर्शन केले. तसेच आता ग्रंथालयात अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता आहे यावर त्यांनी प्रकाश टाकला.

अभ्यासक्रमाचे संयोजक श्री. नारायण बारसे यांनी या अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांनी विद्यार्थ्यांची सर्व समंत्रकांशी ओळख करून दिली.

विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथपाल कादंबरी करदेकर यांनी आभार प्रदर्शन केले.

**जीवशास्त्रज्ञांसाठी रसायनशास्त्र**

रसायनशास्त्र विभागाने जीवशास्त्रज्ञांसाठी रसायनशास्त्र या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा सोमवार दिनांक २५ सप्टेंबर २००६ रोजी आयोजित केली होती. या कार्यशाळेत रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांचे शिक्षक व तृतीय वर्ष विज्ञान शाखेचे विद्यार्थीही सहभागी झाले होती.

जीवशास्त्र विषयाच्या शिक्षकांना रसायनशास्त्र किंवा जीवरसायनशास्त्र हा विषय तृतीय वर्षातील मुलांना शिकवावा लागतो. सुधारित अभ्याक्रमानुसार जीवशास्त्र विषयाच्या शिक्षकांना विविध क्षमतेची दावण प्रयोगासाठी तयार करावी लागतात. त्यामुळे जीवशास्त्र विभागतर्फे त्यांचे रसायनशास्त्रचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी विनंती करण्यात आली. या कार्यशाळेत रसायनशास्त्राची काही मूलभूत तत्त्वे समाविष्ट करण्यात आली होती.

रसायनशास्त्र विभागाच्या शिक्षकांनीदेखील उत्स्फूर्तपणे ही विनंती स्वीकारून एक दिवसाची कार्यशाळा आयोजित केली. जीवशास्त्राच्या शिक्षकांनी सुचवलेल्या विविध मुद्यांवर येथे चर्चा करण्यात आली. या कार्यशाळेत रसायनशास्त्र व जीवशास्त्र विभागाचे १० शिक्षक व ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

**जलतरण स्पर्धा**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष विज्ञान शाखेत शिकत असलेल्या कु. संजय वसंत वाडेकर या विद्यार्थ्याला मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या जलतरण स्पर्धेत रौप्य पदक मिळाले.

**लायनक्स ट्रेनिंग प्रोग्राम**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे लायनक्स या विषयावर विविध महाविद्यालयातील शिक्षकांसाठी १५ व १६ सप्टेंबर २००६ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर, यांनी या कार्यशाळेचे उद्‌घाटन केले. माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख श्री. अभिजित काळे यांनी सभासदांचे स्वागत केले तसेच प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाबद्दल ओळख करून दिली.

श्री. अरविंद शर्मा आणि सुहास कोटे, Chief Executive रूट टेक्नॉलॉजी यांनी २ दिवसासाठी कार्यशाळेची सत्रे घेतली.

रेड हॅट प्रायवेट लिमिटेडचे विभाग व्यवस्थापक श्री. प्रकाश शेट्टी यांच्या हस्ते कार्यशाळेच्या समारोपाच्या दिवशी प्रशस्तिपत्रे प्रदान करण्यात आली. सर्व सभासदांनी या कार्यशाळेसाठी महाविद्यालयाने तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीचा उल्लेख केला.

## जोशी – बेडेकर कला वाणिज्य महाविद्यालय

**सप्टेंबर – २००६.**

**शनिवार दि. २ सप्टेंबर २००६**

१) विद्या प्रसारक मंडळाच्या पदवीदान सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर स्टाफ अकादमीने भारत-अमेरिका अणु करारावर आधारीत श्री. प्रकाश बाळ, मुक्त पत्रकार यांचे एक व्याख्यान प्राध्यापक वर्ग स्कॉलर्स अकादमी व विद्यार्थीवर्गासाठी आयोजित केले होते त्याला सर्वांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

२) महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी (एन.एस.एस.) स्त्री शिक्षणावर आधारित (बालिका शिक्षण) एक पथनाट्य मानखुर्द येथे सादर केले.

३) राष्ट्रीय सेवा योजनेच्या २५ विद्यार्थ्यांनी 'एडस्' विषयक जनजागृतीसाठी एक रिबन रॅली आयोजित केली.

**रविवार दि. ३ सप्टेंबर २००६**

१) गणपती विसर्जनाच्या सातव्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या २५ विद्यार्थ्यांनी वर्तकनगर पोलीस ठाण्याला विसर्जनाच्या आयोजनासाठी मदत केली.

**सोमवार दि. ४ सप्टेंबर २००६**

१) विद्यार्थी परिषदेने सत्यनारायण पूजेचे आयोजन केले.

२) एन्ट्री इन्टर सर्व्हिसेस च्या विद्यार्थ्यांसाठी उपप्राचार्या डॉ. पद्मिनी मूर्ती यांनी भारतीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतीवर एक विस्तृत व्याख्यान दिले.

**मंगळवार ५ सप्टेंबर २००६**

१) विद्यार्थी परिषदेने शिक्षक दिन साजरा केला.

**बुधवार, ६ सप्टेंबर २००६**

१) अनंत चतुर्थीसाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या २५ विद्यार्थ्यांनी वर्तक नगर पोलीस ठाण्याला गणेश विसर्जनासाठी मदत केली.

**शनिवार ९ सप्टेंबर २००६**

१) इंग्रजी विभाग निर्मित भित्तीपत्रकाचे प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी प्रकाशन केले.

२) एन्ट्री इन्टर सर्व्हिसेस आणि रेमिडिअल कोचींगच्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा आयोजित करण्यात आली. सभेला प्राचार्य डॉ. सिंग, प्रा. प्रकाश शिंदे, प्रा. सौ. शास्त्री, प्रा. डॉ. पद्मिनी मूर्ती यांनी मार्गदर्शन केले.

**बुधवार, १३ सप्टेंबर २००६**

१) ओॲसिस नेचर क्लब व भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'वॉटर हारवेस्टींग' या विषय प्रा. विद्याधर वालावलकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२) विविध व्यवसाय संधीवर आधारीत 'एअरलाईन्स आणि टुरीझम' क्षेत्रावर आधारीत श्री. विशाल दाखे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

३) आपत्कालीन 'व्यवस्थापन' या विषयावर प्रा. तेजस्विनी नाडगौडा यांचे एकदिवसीय कार्यशाळेत व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यशाळेत राष्ट्रीय सेवा योजनेच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या २० व अन्य महाविद्यालयाच्या ३० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

**गुरुवार १४ सप्टेंबर २००६**

१) हिंदी वाङ्मय मंडळाचे हिंदी दिवसानिमित्त उद्‌घाटन झाले. आर.के.टी महाविद्यालयाच्या हिंदी

विभागाचे प्रमुख डॉ. संतोष मोखानी यांनी 'हिंदी भाषा व व्यवसायाच्या संधी' या विषयावर व्याख्यान दिले.

२) महाराष्ट्र एज्युकेशन फाऊंडेशन श्री. वासूदेवन यांनी 'व्यवसाय मार्गदर्शन' कार्यक्रमांतर्गत 'ॲटीट्यूड टेस्ट' आयोजित केली.

**शुक्रवार दि. १५ सप्टेंबर २००६**

१) एन.आय आय. टी. चे श्री. संतोष पाटील यांचे 'माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी' या विषयावर व्याखान व मार्गदर्शन.

२) श्री. विनोद मनडानिया यांचे 'सेव्हन हॅबीट्स् ऑफ हायलि इफेक्टिव्ह पीपल' या विषयावर स्कॉलर्स अकादमीसाठी विशेष व्याख्यान.

**शनिवार १६ सप्टेंबर २००६**

१) डॉ. बेडेकर व्यवस्थापन संस्थेचे ग्रंथपाल श्री. संदीप भावसार यांचे M Lib I Sc च्या विद्यार्थ्यांसाठी विशेष व्याख्यान.

**गुरुवार २१ सप्टेंबर २००६**

१) 'जे' गटातील महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक - ठाणे परिसरातील १५ प्राचार्यांची डॉ. शकुंतला सिंह यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

**शुक्रवार १९ सप्टेंबर २००६**

१) राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 'रक्तदान शिबिर' आयोजित करण्यात आले.

**शनिवार २३ सप्टेंबर २००६**

केळकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. पी.जी. करमरकर यांचे व्याख्यान.

**सोमवार २५ सप्टेंबर २००६**

१) महाविद्यालयाच्या प्राध्यापकवर्गाची एक बैठक घेण्यात आली.

**मंगळवार १० ऑक्टोबर २००६**

१) 'आत्महत्या प्रतिबंधक दिना' निमित्त महाविद्यालयाच्या राष्ट्र सेवा योजना, एन.सी.सी. चे विद्यार्थी, विद्यार्थीवर्ग व प्राध्यापक वर्गाची जनजागृती अभियानासाठी प्रचारफेरी ठाणे शहरात आयोजित करण्यात आली.

**हिंदी वाङ्मय मंडळाचे डॉ. संतोष मोखानी यांच्या हस्ते उद्घाटन**
**गुरुवार दि. १४ सप्टेंबर २००६**

हिंदी दिवसांचे औचित्य साधून (१४ सप्टेंबर) जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या हिंदी वाङ्मय मंडळाचे आर.के.टी. महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख डॉ. संतोष मोखानी यांच्या हस्ते १४ सप्टेंबर रोजी उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी 'हिंदी भाषा आणि व्यवसायाच्या संधी' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी डॉ. संतोष मोखानी म्हणाले की, भाषिक क्षमतेबरोबरच उच्चारणालाही तितकेच महत्त्व आहे. हिंदी भाषेमुळे वृत्तनिवेदन; जाहीरात इत्यादी क्षेत्रात भरपूर संधी उपलब्ध आहेत.

हिंदी विभागप्रमुख प्रा. अनिल ढवळे म्हणाले की जागतिकीकरणाच्या लाटेत सर्वात जास्त फायदा हिंदी भाषा शिकणाऱ्यांना होत आहे. त्याचबरोबर प्रसारमाध्यमे तसेच जाहीरात क्षेत्रातही भरपूर संधी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे प्रसारमाध्यमांत हिंदी भाषा समजणारे, ज्ञान असणारे व हिंदी भाषा बोलणारे, सर्वात जास्त लोक कार्यरत आहेत.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करताना प्राचार्य

डॉ. सौ. शकुंतला सिंह म्हणाल्या की साहित्यात सौंदर्य असते आणि साहित्य आणि तत्त्वज्ञान एकमेकांना परस्परपुरक असतात.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुधा मिश्रा या विद्यार्थीनीने तर जयेश या विद्यार्थ्याने उपस्थितांचे आभार मानले.

**सप्टेंबर २००६ मधील कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रम व इतर उपक्रम**

**मंगळवार ५ सप्टेंबर २००६**

१) शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी वर्गात शिक्षक म्हणून व्याख्यानं दिली.

**गुरुवार ७ सप्टेंबर २००६**

१) नेचर क्लब तर्फे 'महादेवाचा डोंगर' येथे सहल

**शनिवार ९ सप्टेंबर २००६**

१) भूगोल विभागातर्फे 'ज्वालामुखीवर' आधारीत माहितीपट दाखविण्यात आला.

२) कला आणि वाङ्मय मंडळातर्फे 'वृत्तनिवेदन आणि अभिनय' या विषयावर मार्गदर्शनासाठी दूरदर्शन कलाकार मधुवंती गाडगीळ यांचे मार्गदर्शन.

**मंगळवार १९ सप्टेंबर २००६**

१) वाङ्मय मंडळातर्फे 'हस्ताक्षर कार्यशाळा' आयोजित करण्यात आली.

**शुक्रवार २२ सप्टेंबर, सोमवार २५ सप्टेंबर २००६**

१) 'इतिहास विषयातील व्यवसायाच्या संधी' या विषयावर प्रा. सुभाष शिंदे यांचे दोन दिवसीय मार्गदर्शनपर व्याख्यान.

**शनिवार २३ सप्टेंबर २००६**

१) पालक - शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले.

**मंगळवार २६ सप्टेंबर २००६**

१) कलामंडळातर्फे गायन स्पर्धेचे आयोजन

२) परीक्षेत अयशस्वी विद्यार्थी तसेच १२ वी च्या कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांच्या पालक सभेचे आयोजन.

**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**

**''राजीव गांधी उर्जा दिन''**

भूतपूर्व प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या जन्मदिना निमित्त ''राजीव गांधी उर्जा दिन'' म्हणून साजरा करण्यात येतो. हा संदर्भ लक्षात घेऊन १९ ऑगस्ट २००६ रोजी मंडळाच्या तंत्रनिकेतनातील आय. एस. टी. ई. चॅप्टर व सिनर्जी ग्रुपच्या वतीने शोधनिबंध सादर करण्याची स्पर्धा आयोजित केली होती. विद्यार्थ्यासाठी व शिक्षकांसाठीही ही स्पर्धा होती. शिक्षकांना विषय दिला होता ''इमर्जिंग ट्रेन्डस इन दी फिल्ड ऑफ एनर्जी कन्झर्वेशन'' आणि विद्यार्थ्यांसाठी विषय दिला होता ''न्यू टेक्निक्स इन दी फिल्ड ऑफ नॉन कनव्हेशनल एनर्जी सोर्सेस.'' शिक्षकांचे १० व विद्यार्थ्यांकडून २२ शोधनिबंध सादर करण्यार आले बहुतांशी शोधनिबंधातून विविध अपर्यायी उर्जेचे विविध पैलू सादर करण्यात आले. त्यातील सिरो पॉईंट एनर्जी, हायड्रोजन एनर्जी, लॅन्डफिल एनर्जी, सोलर एनर्जी हे विषय स्पर्धकांनी मांडले. कलेक्टर ऑफिस ठाणे व महाराष्ट्र उर्जा विकसित संघटना यांच्या पाठिंब्याने हा कार्यक्रम सादर करण्यात आला होता.

श्री. नंदकुमार जंत्रे (जिल्हाधिकारी, ठाणे) श्री. शिवाजीराव बोडके (प्रोजेक्ट ऑफिसर MEDA) यांनी



उद्घाटनाच्या वेळी डावीकडून - सौ. वडेर, श्री. नायक (प्राचार्य), श्री, सहस्रबुद्धे, डॉ. घाटोळ (प्रमुख पाहुणे) श्री. राणे, श्री. बोडके




समारोपाच्या वेळी डावीकडून - सौ. वडेर, श्री. नायक (प्राचार्य), डॉ. लांडे, सौ. इंगवले

हा कार्यक्रम सादर करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. ए. ए. घाटोळ (उप-कुलगुरू) डॉ. बाबासाहेब आंबडेकर टेक्नॉलॉजी विद्यापीठ लोणेर) श्री. विनय सहस्रबुध्दे (महासचिव रामभाऊ म्हाळगी प्रज्ञा प्रबोधिनी) या सन्माननीय पाहुण्यांनी केले.

तंत्रनिकेतनाच्या आय. एस. टी. ई. चॅप्टरच्या वतीने होते असलेल्या विविध उपक्रमाबाबत श्री. घाटोळ यांनी समाधान व्यक्त केले. प्राचार्य श्री. दि. कृ नायक यांनी ''उर्जेचे महत्त्व व त्याची सामाजिक स्थिती'' या विषयी भाषण केले. डॉ. मिलिंद राणे (प्रोफेसर, एनर्जी सिस्टिम आय. आय. टी) हे प्रमुख व्याख्याते या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी ''एनर्जी एफियियन्ट टेक्नॉलॉजी रेफ्रिजरेचन व एअर कंशियनिंग'' या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

स्पर्धेसाठी डॉ. तांदळे (मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रमुख, बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल युनिव्हर्सिटी, लोणेर) श्री. एस. व्ही. कुलकर्णी (एनर्जी कन्सलटन्ट) यांनी प्राध्यापकांच्या शोधनिबंधाचे परिक्षण केले.

विद्यार्थ्यांच्या शोधनिबंधाचे परीक्षक होते. श्री. प्रा.पी. एन. पडघन (गव्हर्मेंट पॉलिटेक्निक), सौ. ज्योती कुलकर्णी (प्राध्यापक श्री. एस.सी.पाटील कॉलेज ऑफ इंडिनिअरिंग नवी मुंबई) आणि श्री. सुधीर फुटाणे (एनर्जी कन्सलटन्ट, ग्लोबल टेक)

या कार्यक्रमाचा निरोप समारंभ डॉ. लांडे (डेप्युटी डायरेक्टर, व्ही. जे. टी. आय. मुंबई) यांच्या हस्ते झाला. विजेत्या स्पर्धकांना स्मृतिचिन्ह व प्रशस्ती पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

प्राचार्य प्रा. दि. कृ.नायक यांच्या मार्गदर्शनामुळे आणि प्रा. सौ. एन. व्ही. वडेर (इलेक्ट्रिकल डिपार्टमेंट प्रमुख) प्रा. सौ. जी.एस. दंगवले (सेक्रेटरी आय. एस. टी. ई. चॅप्टर) व प्रा. सौ. एस. एल. कुलकर्णी (सेक्रेटरी सिननी ग्रुप) यांच्या नियोजनामुळे कार्यक्रम संपन्न झाला.

## रिमोट सेन्सिंग जिओ

आय. एस. टी. ई. चॅप्टर तर्फे विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात ५ ऑगस्ट २००६ रोजी तंत्रज्ञान विषयक शोधनिबंध सादरीकरणाची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा विषय होता ''रिमोट सेन्सिंग जिओ - इन्फॉर्मेटिक्स''

स्पर्धेसाठी परीक्षक होते श्री. राहुल कुलकर्णी (सिनिअर मॅनेजर - मार्केटिंग - कम्युनिकेशन डिव्हिजन) सिमेन्स लि. मुंबई, श्री. एस. वाय. कुलकर्णी (सायंटिफिक ऑफिसर एस. ओ./एस. इ. समीर आय. आय. टी. कॅम्पस




From Left Mrs. Kirti S. Aagashe (I/C Industrial Electronics) V.P.M.'s Polytechnic Mrs. G.S. Ingawale (ISTE Chapter secretary & co-ordinator of competition), Dr. Madhav Kulkarni (HOD, civil engineering IIT Powai, Mumbai, Mr. Achyut Godbole (well known writer), Mrs. N.V. Vedar (H.O.D) E.Pu.dept V.P.M.'s Polytechnic Thane)

पवई) , डॉ. सौ. राधा नटराजन (डिपार्टमेंट ऑफ जिऑग्राफी के. जी. जोशी कॉलेज ऑफ आर्टस आणि एन. जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स), श्री. एम. वाय. जोशी (सायंटिफिक ऑफिसर एस. ओ. /एस. ई.) या स्पर्धेसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतन व्यतिरिक्त ठाकुर पॉलिटेक्निक, सेंट झेविअर कॉलेज, के. जे. सोमय्या पॉलिटेक्निक अशा विविध महाविद्यालयातून प्रतिनिधी विद्यार्थी आले होते.

प्रथम पारितोषिक मिचेला विश्वनाथन, सेंट झेविअर कॉलेज, मुंबई, दुसरे पारितोषिक अनुश्री शेणॉय वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे, तिसरे पारितोषिक नेहा रस्तोगी मुळाला पॉलिटेक्निक ठाणे.

प्राचार्य श्री. दि. कृ. नायक यांच्या प्रोत्साहनामुळे हा कार्यक्रम झाला. सौ. जी. एस. इंगवले आ. एस. टी. ई. चॅप्टर सेक्रेटरी, तसेच विभागाचे शिक्षक सौ. ॲनिस अलाहस, सौ. स्मिता खंडगळे, कु. दीप्ती मुळगावकर कु. सोनल दुबे कु. प्रिया फडणीस, श्री. स्वप्नील जोशी यांच्या मदतीने हा कार्यक्रम यशस्वी झाला.

## डॉ. बेडेकर विद्यामंदिर

### ९ ऑगस्ट

९ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट ०६ च्या कालावधीत २०वी ठाणे जिल्हा बॅडमिंटन चॅम्पीयनशीप स्पर्धा, जिल्हा स्तरावर नवी मुंबई, वाशी येथे घेण्यात आल्या या आपल्या शाळेतील प्रणव दांडेकर (१०अ) याने द्वितीय फेरीपर्यंत मजल मारली.

### १८ ऑगस्ट :

शाळेमध्ये संस्कृत दिनाचा कार्यक्रम साजर झाला.

न्यू इंग्लिश स्कूल मधील जेष्ठ शिक्षक श्री. श्रीकांत बर्वे यांनी इ. १० अ, ब च्या विद्यार्थ्यांसाठी संस्कृत सुभाषितांवर आधारित, संस्कृत भाषेतील गमती जमती सांगणार कार्यक्रम पारदर्शिकेच्या सहाय्याने केला. कार्यक्रमाचे आयोजन सौ. मीरा लिमये व श्री. दीपक धोंडे यांनी केले तर अभिजित इनामदार (१०अ) याने संस्कृत मधून सूत्रसंचलन केले.

### २२ ऑगस्ट :

भगवती विद्यालयात 'वाचन संस्कृती विकास प्रकल्पाचा' शुभारंभ झाला. बदलापूर ते मुलुंड या ठिकाणच्या निवडक २० शाळांना श्रीमती जोत्स्ना केशव बझे यांनी सर्व आर्थिक मदत करून रू. २००/- किमतीचा ३० पुस्तकांचा संच भेट म्हणून दिला.

ठाण्यातील शैक्षणिक उपक्रमांत विशेष मार्गदर्शन करणारे श्री. अशोक टिळक या उपक्रमाचे निमंत्रक होते तर आपल्या शाळेतील सौ. मीरा लिमये ह्या मार्गदर्शक शिक्षिका म्हणून उपस्थित होत्या.

१८ जुलै ते २४ जुलै ०६ या कालावधीत शिवसमर्थ विद्यालयांत सर्व विषयांचे स्वाध्याय पुस्तिकांचे लेखन केले गेले. हिन्दी विषयातील स्वाध्याय लेखन आपल्या शाळेतील सौ. निर्मला अविनाश वाघ यांनी केले.

**१९ ऑगस्ट :**

संजय गांधी उद्यान टिकुजिनी वाडी, ठाणे येथे वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमास इ. ८ वी चे सर्व स्काऊट-गाईडचे विद्यार्थी, श्री. पांचाळ व श्री. जयराम गावित उपस्थित होते.

**२० ऑगस्ट :**

'राजीव गांधी स्मृतीदिना' निमित्ताने 'अक्षय उर्जा दिन' साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने पोलीस परेड ग्राऊंड ते दादोजी कोंडदेव स्टेडियमपर्यंत ठाणे शहरात रॅली काढण्यात आली. रॅलीत इ. ७ वी चे स्काऊट व गाईडस् तसेच श्री. पांचाळ व सौ. कारंडे - जोशी उपस्थित होते.

**२१ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट :**

या कालावधीत इ. ७ वी चे इंग्रजी पुनर्रचित अभ्यासक्रमांतर्गत शिक्षण प्रशिक्षणास आपल्या शाळेतील सौ. सुनंदा गोतावळे, सौ. सायली माने, सौ. कारंडे जोशी उपस्थित होत्या.

**८ सप्टेंबर - ०६ :**

'रेडिओ इलेट्रिकल इन्स्टिट्यूट' या संस्थेतर्फे इ. १० 'क' 'ड' या विद्यार्थ्यांसाठी १० वी नंतर काय? या बद्दल सौ. क्षितिजा कापरे व सौ. शीला चिटणीस यांनी मार्गदर्शन केले. ज्या विद्यार्थ्यांना ६०% पेक्षा कमी मार्कस् मिळतात किंवा १० वी नापास होतात त्यांच्या साठीही असलेल्या कोर्स बद्दल पारदर्शिकेद्वारा सरकारने सुरू केलेल्या विविध सर्टिफिकेट व डिप्लोमा कोर्सेसची माहिती सांगितली.

कार्यक्रमाची सुरुवात सौ. मीरा लिमये यांनी केली तर आभार आशा जोशी यांनी मानले.

**६ सप्टेंबर :**

'अनंत चतुदर्शी' च्या दिवशी मासुंदा तलाव ठाणे येथे गणेश विसर्जन करण्यात येते. त्यावेळी सेवा प्रकल्प म्हणून इ. ८ वी च्या स्काऊट व गाईडस् यांनी पोलिसांना मदत कार्य केले. या सेवा प्रकल्पात श्री. पांचाळ उपस्थित होते.

**८ सप्टेंबर :**

वसंत विहार क्लब येथे झालेल्या 'राष्ट्रीय समूह गान' स्पर्धेत आपल्या शाळेतील पल्लवी राणे, मानसी जाधव, सायली पोरे, हर्षना टावरे, प्रियांका परुळेकर, पूजा फणसे, रोहन जोशी, दक्षता सावंत या विद्यार्थ्यांनी गीत सादर केले.

हार्मोनियमवर श्रद्धा यादव हिने साथ दिली व मार्गदर्शन कु. आशालाता लोखंडे व सौ मंजिरी दांडेकर यांनी केले.

**५ सप्टेंबर :**

'ब्राह्मण सेवा संघाचा' २००६-०७ चा पुरस्कार डॉ. शांताराम आपटे यांच्याहस्ते आपल्या शाळेतील सौ. अपर्णा भट ह्यांना देण्यात आला.

**३ ऑगस्ट :**

'ब्राह्मण सभा' ठाणे या संस्थेतर्फे लो. टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने शालेय विद्यार्थ्यांसाठी झालेल्या वक्तृत्वस्पर्धेत आपल्या शाळेतील कु. कौस्तुभ विलास बांबरकर ह्याने प्रथम क्रमांक मिळविला. त्याचा विषय होता 'शालेय शिक्षणातील गणिताचे स्थान'.

**५ ऑगस्ट :**

ब्राह्मण सेवा संघातर्फे झालेल्या संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेत आपल्या शाळेचा निकाल १००% लगला असून शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी पुढील प्रमाणे-

१) प्रणव प्रभाकर फिरके - ठाण्यात सर्वप्रथम ९८%

२) वृषाली सुरेश कुदले - द्वितीय क्रमांक ९७%

३) नंदकिशोर मोहन दळवी - तृतीय क्रमांक ९६%

४) प्राजक्ता बाबासाहेब शिंदे - चतुर्थ क्रमांक ९५%

**५ सप्टेंबर**

शिक्षक दिना निमित्ताने आपल्या शाळेच्या माननीय मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर यांचा 'शिक्षण-क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी' बद्दल लयन्स क्लब, ठाणे यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला.

**१९ सप्टेंबर**

रोटरॅक्ट क्लब, ठाणे यांच्या तर्फे उत्स्फूर्त चित्रकला व निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. आपल्या शाळेतील कु. कौस्तुभ विलास बांबरकर याला दोन्ही विषयांत द्वितिय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**२० ऑगस्ट :**

'सिफनी म्युझिक ॲकॅडमी' तर्फे गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. आपल्या शाळेतील कु. श्रद्धा रमेश यादव (९अ) हिला भावगीत ह्या संगीत प्रकारात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**१२ सप्टेंबर :**

ठाणे भारत स्काऊट-गाईड जिल्हा कार्यालय, ठाणे यांच्या तर्फे आपल्या शाळेतील कु. आशालता लोखंडे व श्री. प्रकाश पांचाळ यांची मार्गदर्शन म्हणून नियुक्ती करण्याक आली.

**१४ सप्टेंबर :**

रोजी ६ वी 'क' च्या स्काऊट-गाईडस् च्या विद्यार्थ्यांचा शपथ विधी समारंभ आयोजित करण्यात आला. या समारंभास मीना पाटणकर (जिल्हा चिटणीस) श्री. प्र. ग. वैद्य (माजी स्काऊट) आणि पर्यवेक्षिका सौ. उषा कळमकर, सौ. साधना जोशी, आशा जोशी उपस्थित होते. सूत्रसंचालन आशालता लोखंडे यांनी केले, शपथ देण्याचे कार्य, स्काऊटर श्री. प्रकाश पांचळ यांनी केले तर स्काऊटर श्री.जीवन जाधव यांनी आभार मानले.

**१३ सप्टेंबर :**

'मराठी विज्ञान परिषदे' तर्फे 'भौतिकशास्त्राचा दैनंदिन जीवनातील वापर' यावर विषयांतर्गत श्री. गीतेश शिंदे व श्री सिध्देश सावंत यांनी इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांना निरनिराळे प्रयोग दाखविले. 'मराठी विज्ञान परिषदेचे' सभासद श्री. रविंद्र खडपेकर हजर होते. पाहुण्यांची ओळख श्री. शिरापुरी सरांनी करून दिली तर आभार आशा जोशी यांनी मानले.

**१४ सप्टेंबर :**

'सस्कार भारती' तर्फे इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'श्यामची आई' या पुस्तकावर नाट्यीकरणात्मक वाचन झाले.

तसेच इ. ८ वी साठी श्री. विलास मनोहर यांनी बाबसाहेब आमचे यांचे सुपुत्र श्री. प्रकाश आमटे यांनी अनेक वन्य व पाळीव प्राणी यांनी त्यांचा सांभाळ कशा प्रकारे केला यावर आधारित नेगल-भाग १ व २ ही दोन पुस्तके लिहिली त्यावर निरनिराळ्या फोटोंच्या आधारे नाट्यीकरणातून वाचन झाले.

**१३ व १४ सप्टेंबर:**

इ. ७ वी च्या इंग्रजी विषयाच्या पुनर्रचित अभ्यासक्रमांतर्गत शिबीर पार पडले. मा. मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर ह्या त्या शिबीरास उपस्थित होत्या

१२ सप्टेंबर रोजी जिल्हा स्तरावर तसेच ११ सप्टेंबर

रोजी खेळल्या गेलेल्या तालुका स्तरावरील बुद्धीबळ स्पर्धेत कु. रसिका चिपळूणकर ही विजयी झाली व तिची विभागीय स्तरावर निवड झाली.

**७ सप्टेंबर व ८ सप्टेंबर :**

वीर सावरकर नगर येथे झालेल्या पावसाळी क्रीडा स्पर्धेत आपल्या शाळेतील १७ वर्षाखालील मुलांचा संघ कब्बडी च्या सामन्यात उपविजेता ठरला.

**१७ सप्टेंबर :**

इंग्रजी विषयाची टिळक महाराष्ट्र विद्यालय, पुणे यांच्या एलिमेंट्री व प्री-एलिमेंट्रीच्या परीक्षा झाल्या. परीक्षा प्रमुख म्हणून आशा जोशी यांनी कार्यभार सांभाळला.

**१० सप्टेंबर :**

फलश्रुती शिक्षण संस्थतेर्फे इंग्रजी माध्यमासाठी झालेल्या (संपूण अभ्यासक्रम) संस्कृत विषयाच्या मार्गदर्शन पर व्याख्यान मालेत श्री. दीपक धोंडे यांचे व्याख्यान झाले.

**१८ सप्टेंबर :**

'मराठी विज्ञान परिषद' 'इनरव्हील क्लब' ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने, विज्ञान जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यांत बांदोडकर कॉलेजच्या प्राचार्य डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी जंगलातील विविध प्राणी, पक्षी, फुलपाखरे त्यांचे विविध प्रकार याबद्दल अतिशय उद्बोधक माहिती इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांना दिली.

**१२ सप्टेंबर :**

रोजी शिवसमर्थ शाळेत तालुका स्तरावर १४ वर्षाखालील मुलींचा खो-खो चा संघ विजयी झाला व त्यांची जिल्हा स्तरावर खेळासाठी निवड झाली.

**१३ व १४ सप्टेंबर :**

१६ वर्षाखाली मुलांची क्रिकेट स्पर्धा आजाद मैदान, मुंबई येथे झाली. त्यांत आपल्या शाळेतील विद्यार्थी पहिल्या दोन शाळांबरोबर विजयी झाले शाळांची नावे पुढील प्रमाणे - वर्तकनगर हायस्कूल, ठाणे व रामरतन हायस्कूल, भाईंदर श्री. गावित जयराम व श्री. गद्री सर उपस्थित होते.

## सौ. आनंदीबाई जोशी विद्यालय

IPM २००६ गणित परीक्षेचा निकाल

| इ. | एकूण विद्यार्थी संख्या | उत्तीर्ण विद्यार्थी | अनुपस्थित | अनुतीर्ण |
|---|---|---|---|---|
| ५वी | २९ | २२ | ६ | १ |
| ६वी | ६ | ४ | २ | ० |
| ७वी | ६ | २ | ४ | ० |
| ८वी | ७ | ६ | १ | ० |
| ९वी | २ | ० | २ | ० |

प्राविण्य प्रमाणपत्र मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे

| इयत्ता | नाव | राष्ट्रीय गुणवत्ता क्रमांक |
|---|---|---|
| इ. ५ वी | कु. सुप्रिया पाटील | ६१ क्रमांक |
| इ. ६ वी | कु. वृषाली प्रसादे | १११ क्रमांक |
| इ. ८ वी | कु. रूचा कारखानिस | १४ क्रमांक |
| इ. ८ वी. | कु. ओजस गोहाड | ७३ क्रमांक |

•••